सालअखेर ११ • ,, १८
किरकोळ अंकास ..........................८२

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस ..........८१

Single copy.................................... 4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 12 MARCH 1894 NO 11

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १२ माहे मार्च सन १८९४ अंक ११

### चार तास होऊन गेले आतां आशा सोडा.

अरे देवा ! मी तीन चार तास व्यर्थ घालविले ते जर परत आणतां आले असते तर किती मजा झाली असती. पहा ! एका क्षणांत मनुष्यावर किती संकटें येऊन पडतात ! !

मिस्तर जेम्स करटीस आणि मिस्तर सी. एस बेनेट हे दोघेजण पुष्कळ वर्षें अगदीं निवलग मित्र होते. ते स्यान फ्रानसिसको शहरांत राहत असत. गेल्या उन्हाळ्यांत पहिल्याच वेळेस एकमेकाच्या उखाळ्या पाखाळ्या काढून बरेच भांडले. सुविचार मनांत आले व पुन्हां त्यांची गट्टी जमली परंतु एकदां घडी बिघडली ती बिघडली विचार देवीनें आपल्या स्मरण वहींत टिपून ठेवलें होतें. तें एकमेकांपासून अलग राहण्याबद्दल खबरदारी घेत होते. ह्या उभयांची गांठ एका रस्त्यांत पडली. पुन्हां भांडण सुरू झालें. करटीसच्या मुखांतून फारच कठोर व काळजाला झोंबण्यासारखे शब्द निघाले आणि त्यांनीं रागाच्या सपाट्यांत पिस्तुल काढली व बेनेटवर झाडून त्यास लागलीच राम ह्मणावयास लावलें. पुढें ही तो स्वनिंदेनें व दुःखानें नाडला गेल्यामुळें वेड्या सारखाच लाखोल्या वाहत असे.

हें पहा असें वागणें किती निरर्थक, कुचकामाचें व दांभिक आहे बरें !

परंतु करटीस ह्मणत असें कीं एका क्षणांत मनुष्यावर कोणतीं संकटें येतील ह्याचा नेम नाहीं. असें आपणास क्षणभर खरें वाटतें परंतु ह्या पेक्षां दुसरा अगदीं खोल विचार आहे तो कोणाच्या ध्यानांत येतो ? ह्या संकटाचें खरें स्वरूप समजलें नाहीं तर कांहीं चिंता नाहीं. तर ह्याच मुद्यावर दुसऱ्या एका गोष्टीचा विचार करूं.

एक सुज्ञ बाई ह्मणते कीं सन १८९० सालीं अक्टोबर महिन्यांत मला असा ज्वर जडला होता कीं त्यांतून मी वाचेन असें मला वाटत नव्हतें. माझ्या शरिरांत सर्व ठिकाणीं वेदना होऊं लागल्या व खोकल्यानें मला इतकें जर्जर करून टाकलें कीं माझ्या शरिराचा चेंदा मेंदा होता कीं काय असें मला वाटलें. मी बिछान्यांत पडून राही परंतु रात्रंदिवस झोंप ह्मणाल तर देवाचें नांव. माझ्यानें उठून बसवत नसल्यामुळें मला चमच्यानें अन्नरस माझ्या तोंडांत घालीत असत. माझी छाती इतकी धडधडत असे कीं ती उशीवर तुह्मास साफ पाहिलें असतां दिसून येईल.

आणि वेदना इतक्या जालीम होत होत्या कीं जसें कोणी मला भोसकत आहे. मी अशी पंगु होऊन अंथरुणाशीं खिळून राहिले व मला दम बरोबर घेतां येईना. वैद्य बोवा आह्मास सतत एक महिनाभर औषधोपचार करीत होते. परंतु दिवसानुदिवस क्षीण होत चाललें. कधीं कधीं रात्रीं माझी अशी गाळण होऊन जाई कीं सकाळ पर्यंत मी जगेन किंवा नाहीं ह्याची मला शंका वाटत असे. त्यांनीं आपल्या दुसऱ्या वैद्याची सल्ला मसलत घेऊन असें ठरविलें कीं हा रोग बरा होणें कठीण आहे मला तकवा आणण्यास थोडीशीं दारू पाजीत असत. माझे यजमान व मुलगी नेहमीं माझ्या जवळ असत. कोणत्याही औषधापासून मला काडी इतका गुण ह्मणून आला नाहीं. मी आतां यमसदनीं जाणार असें मला वाटूं लागलें.

अशा वेळीं ह्रिमथ जवळच्या मोठ्या गांवांतील मिसीस किलींग माझी मैत्रीण होती ती धांवून आली व मला मदर सिजिलचे क्युरेटिव सिरप ( ह्मणजे माता सिजेलचा रोग हारक पाक ) घेण्यास गळ घातली. मी लागलीच एक बाटली पैदा करवून औषध घेण्यास सुरू केलें. थोड्याच दिवसांनीं मला अन्न घेतां येऊन पचविण्याची शक्ती आली आणि वाईट लक्षणें कमी होत चालली. ह्यावरून असें दिसून येतें कीं ज्या उपाधीनें हिच्या शरिरांत आपला पूर्ण अम्मल बसवून इतक्या शिखरास पोचविला होता कीं तिच्या आयुष्याची दोरी तुटण्याची वेळ जवळ येऊन ठेपली आपल्याला उपाधि समजो व न समजो परिणाम असाच व्हावयाचा. करटीसनें जो अपराध केला होता त्याचें मुख्य कारण त्याचें एकदम रागावणें व त्या भरांत धिःकार व सुड घेण्याच्या विचारास उत्तेजन देणें व मन असल्या दुष्ट हेतूस स्वाधीन होऊन अशा प्रकारचे खुन करण्यास तयार होणें हें होय. ह्याचप्रमाणें ह्या बाईच्या रोगाची उपाधि ह्मटली असतां अग्निमांद्य व अजीर्ण होय. कीं जी अखेरीस बेकाम होऊन जिवास धक्का बसविण्यास कारणीभूत झाले ह्याचें सार ह्मणाल तर एकच. अरिष्टाची टेहळणी प्रारंभींच करावी व पुढें वाढूं देऊं नये ह्मणजे तें अरिष्ट आपल्या आटोक्यांत सहज ठेवतां येतें.

ह्या औषधीच्या सहा बाटल्याचा फन्ना केल्यावर माझी तब्येत पूर्ण ताळ्यावर आली आणि तीस वर्षांपूर्वीं पेक्षां मला आतां हजार हिशानें बरें वाटत आहे. माझ्या दोन मुली पण अजीर्णापासून त्रासल्या होत्या त्या ह्या औषधानेंच बऱ्या झाल्या. मला कोणी विचारतील त्यास मी मोठ्या आनंदानें सांगेन.

( सही ) मिसीस लुई ज्याकसन
बिल्डर्स आर्मस होटेल
ब्रिजरोड, ह्यामरस्मिथ, लंडन
तारीख १४ माहे जानेवारी
सन १८९२

वर लिहिलेल्या ओळी ज्या पत्राचें सार आहे त्यांत मिसीस जानसन बाई असें प्रदर्शित करते कीं सन १८९० च्या अक्टोबरांत जें दुखणें लागलें होतें त्याच्या वीस वर्षां पूर्वीं तिचे पित्ताशय व पक्वाशय बिघडली होती. तिच्या तोंडाची रुचि बिघडून गेली होती. आणि थोडें जरी खालें तथापि तिच्या पाटांत कळा मारीत. तिला थकल्यासारखें व गळून गेल्यासारखें आणि उदास झाल्यासारखें वाटे आणि पोट अगदीं खोल गेल्यासारखें वाटल्यामुळें तिला फारच वाईट वाटे. तिच्या छातींत बरगड्यांत तीव्र वेदना होत, छातींत धडधड होई, घेरी येई व वारंवार रस्त्यांत पडे व तिला घरीं कोणी तरी उचलून आणीत.

F. L.

---

NEARLY READY

**CRIMINAL COURT MANUAL.**

*for the*

Hyderabad Assigned Districts
by
Mr. R. Obbard
assisted by
Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws ), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

---

### पाकदर्पण,

अथवा

महाराष्ट्रीय स्वयंपाक शास्त्र,

सौ० गोदावरीबाई पंडित यांणीं केलेलें.

हें पुस्तक ग्रंथकर्त्रीनें स्वतः अनुभव घेऊन ह्मणजे निरनिराळीं पक्वान्नें, भाज्या, चटण्या, कोशिंबिरी, खिरी, तोंडीलावणीं, पापड, सांडगे, इत्यादि सर्व प्रकारचे, अगदीं साध्या भोजनापासून ते मोठ्या मेजवानीच्या पदार्थापर्यंत, सर्व पदार्थ कसे करावे, किती प्रमाणानें घ्यावे वगैरेंचें खुलासेवार आणि अगदीं साधें विवेचन केलेलें असें पाकशास्त्रसंबंधीं झालेल्या पुस्तकांत हेंच पहिल्या प्रतीस बसणारें पुस्तक झालें असून तें नुकेंच छापून प्रसिद्ध केलें आहे. याचीं पानें सुमारें १२९ असून किंमत १। रुपया ठेविली आहे. प्रस्तावनेंत ग्रंथकर्त्रीनें थोडेसें आत्मचरित्रही दिलें आहे. टपालहंशील ८१ आणा पडेल.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूच मालक.

---

### जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा, स्टेशन धर्म शाळेचा, व आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा सन १८९४।९५ सालाकरितां हरास तारीख २२ माहे मार्च सन १८९४ इसवी रोजीं सकाळी ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदहू तारखेस हजर होण्याचें करावें. कळावें तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १८९४ इसवी.

B. M. Sathe
Secretary
A. M. C.

---

### विजया दशमीचें सोनें

( ९ व्या अंकावरून चालू )

How calm it was !—the silence there
By such a chain was bound,
That even the busy woodpecker
Made stiller by her sound
The inviolable quietness;

The breath of peace we drew
With its soft motion made not less
The calm that round us grew.
There seem'd from the remotest seat
Of the wide mountain waste
To the soft flower beneath our feet
A magic circle traced,
A spirit interfused around,
A thrilling silent life;
To momentary peace it bound
Our mortal nature's strife;—
And still I felt the centre of
The magic circle there
Was one fair Form that filled with love
The lifeless atmosphere.

हें उपवन शांत किती?— लोह निगुडबद्ध शांतता वाटे॥
तरु—पल्लव ना हाले, स्तब्ध विहंगम समूह या वाटें ॥१४॥
कोंडे घनतम ती या एकाकी - काष्ठकूट-खग नादें ॥
तरुला महीधरा ती ना केवळ, दिव्यकांति गगनादे ॥१५॥
दुर्भेद्याचे हे; अस्मन्मंदगति श्वास पवन नादांनीं ॥
अधिक गहन गमते; ही पसरे गिरिगव्हरीं नभीं रानीं ॥१६॥
दूर-महीधर शिखरास्थळीं जें विस्तृत माळरान वसे ॥
या उपवनांत तेथुनि मोठा वा सान जो पदार्थ असे ॥१७॥
अत्पल्प- कुसुम देखिल ( जातां जें आमुच्या पदें चिरडें )॥
पादप-नूतन-पल्लव, वा खगकुल, सूक्ष्मजंतु सान किडे ॥१८॥
दृढमाया जालवलें बद्ध निखिल वस्तु ती वनीं दिसते॥
सर्वंग चित् शक्तीनें ही पुलकित मूकवसना करिते॥१९॥

संसारतप्त मानस मम एक मुहूर्त शांति-
सुख सेवी॥
निरुपम निरवधि नदंन वन वासचि दिव्य स-
ज्जना नेवी ॥२०॥
या मायावलयाचा मृगनपण मध्य बिंदु ही
गमली॥
निसत्व सृष्टिआदि स्नेहाकुल करि परीप
शक्ति भक्ति ॥२१

( पुढें चालेल )

## वऱ्हाडसमाचार

मिति फाल्गुन शुद्ध ९ शके १८१५

## आयात मालावर जकात.

( परंतु विलायती कपडा मार्फीत. )

हिंदुस्थान देश लक्ष्मीचें माहेरघर होतें ो पुराणांतली कथा झाली पण सांपत हा श निष्कांचन, कर्जबाजारी, आणि नादार नला आहे. राज्यकर्ते इंग्रजबहादूर यांस या शा विषयीं मोठी काळजी पडली आहे. ल्यावाच रुपये दरसाल वसूल येतो पण त्याहून अधीक खर्च करावा लागतो. त्या ठ कर्जें काढण्याच्या वाटा सर्व शोधून दल्या, लोकांच्या मिळकती वर कर बस- ले, प्राणरक्षक जे आहाराचे पदार्थ त्या ों मुख्य व अत्यंत आवश्यक पदार्थ जें ; त्यां वर मणी २ रुपये कर बसविला णि तेवढ्यानें भागलें नाहीं ह्मणून मणी रुपये कर बसविला. एवढे हर प्रयत्न परंतु खर्चाचें तोंड जें उत्तरोत्तर मोठें आहे तें कांहीं बंद झालें नाहीं. सन ९४–९५ सालच्या बजेटांत ३॥ साडे १ कोटी रुपयांची तूट येईल असा हिंदुस्था । फडणीस मि० वेस्टलांड यांचा अंदाज हे.

ही तूट भरून काढण्यासाठी या फडाणि- ीं जकातीच्या कायद्याचा मसूदा इंडिया दे कैंसिल समोर आणिला आहे. या द्यांत विलायती कापड्यावर जकात बस- ो नसून इतर बहुतेक पदार्थांचा जका- या कोष्टकांत समावेश केला आहे. या ती पासून १ कोट २० लक्ष रुपये न होईल असा अदमास आहे. आणि ६ तीन कोटींची भरती करण्या साठीं कोट १० लक्ष रुपयांचा दुष्काळ फंड बुडविण्याचा घाट अहे. बाकीची तूट ीत काटकसर करून व कांहीं जमेच्या ींचें उत्पन्न वाढवून कशी तरी भरून ण्यांत येईल असें 'पायोनिअर' पत्रकर्ते तात. जकातीचा कायदा व इतर उपाय न साडे तीन कोटींची भरती झालीच तर चित पराकाष्ठेनें होईल!

जकातीचा मसूदा कायदेकौंसिलांत येणार असें कळतांच म्यानचेस्टर वाल्यांनीं ंच लार्ड किंबरले यांच्या जवळ विला- कपड्यावर जकात बसवूं नये ह्मणून रडारड केली तेव्हां स्टेट सेक्रेटरींनीं आश्वासन दिलें आणि त्या प्रमाणें त्यांनीं आपला अधिकार आपल्या कैंसिलदारांच्या अभिप्राया विरुद्ध गाजविला. कोणत्याही सूचनेला समूळ नेण्याचें अकरणरूपी संहारकर्तृत्व स्टेट सेक्रे- टरी यांच्या हातीं असेंत तें त्यांनीं मंत्रीमंडळांत अंमलांत आणिलें. हिंदुस्थान सरकारही फार शहाणें व जातिबांधवाचे कनवाळू खरें! मि वेस्टलांड यांनीं आपल्या मसुद्यांत देखील विलायती कापडावर जकात बसवावी असें सदर घातलें नाहीं.

अर्थशास्त्र व निष्प्रतिबंध व्यापार यांच्या तत्वांस स्वार्थवादी राज्यकर्त्यांनीं तिळांजली वाहिली यांत नवल काय! विलायती कापड जकातीच्या सदरांतून वगळलें ही एवढ्या अन्यायाची थोड्या एवढी चूक अहे कीं त्या बद्दल सर्व नेटिव पत्रकर्ते ओरड करितीलच करितील परंतु आंग्लो. इंडियन पत्रकार दे खिल चवताळले आहेत. कोण ही क्षूद्रदृष्टी! न्यायाची समता, भेदाभेदांची अभाव, आणि सर्व प्रजा सारखी हक्कदार इत्यादि कोटिक्रम कोठें अस्तास गेले आहेत न कळे. तीस कोट प्रजेच्या पोटावर पाय देऊन अन्यायानें, अ धमवृत्तीनें, आणि पापवासनेनें इंग्रज सरकार फक्त म्यांचेस्टरच्या क्षुद्र, हलकट, व अगदीं थोड्या लोकांच्या कल्याणासाठीं विलायती कापडावर जकात न बसवितील तर इंग्रज लोक राज्यकर्ते, सत्ताधीश व प्रभुत्वपदावर चढलेले आहेत ह्मणून या देशची मुकी, राज- निष्ठ, व दीन प्रजा स्वस्थ कांहीं काळ रा- हील हेही खरें! परंतु आमच्या राज्यकर्त्यां च्या नीतिमत्तेचा किल्ला वरील म्यानचेस्टर वाल्यांच्या नीचतम सुरूंगानें जमीनदोस्त झाला तर तलवारीच्या बळावर कोणतें राष्ट्र चिरायु व चिरकाल टिकलें आहे याविषयीं इ- तिहासज्ञ तत्ववेत्ते तत्काळ कान उघाडणी क रितील.

कुबेराला देखील आमचे सरकार दरिद्री करील मग त्यांच्या हातीं हिंदुस्थानची काय कथा! लार्ड रिपन साहेबांच्या वेळीं ७१ कोटीचा खर्च होता तो गेल्या दहा वर्षांत ९२ कोटींचा झाला आहे. हिंदुस्थानचे फड णीस खर्च अवाढव्य वाढल्या विषयींचा घडा हुंडणावळीच्या भावाच्या नांवानें सुखेनैव फो डीत परंतु वास्तविक प्रकार तसा नाहीं. ल ष्करी खर्चाला कांहीं ताळच नाहीं. ब्रह्मदेश जिंकिला, सरहद्द कायम केली व मजबूत के ली, राज्यें खालसा केलीं आणि अशेच सर्व प्रकार ज्या राज्यलोभानें चालित केले त्या सर्वंकष राज्यतृष्णेपुढें पृथ्वीवरील कोणत्या संपत्तीचा फन्ना उडणार नाहीं. एवढें कोट्या वधि रुपयांचे खर्च वाढविले, सर्व देशाचा खजिना लुटून फस्त केला, अणि कर्जें का ढण्याची व कर बसविण्याची मर्यादा लोटलीं तरी देखील १८९४–९५ सालच्या बजेटांत साडे तीन कोट रुपयांची तूट! हुंडणावळी- ची मनोती देण्याचें ठरवून दोन कोटीचा खर्च वाढविला हा कमी होऊं शकत नाहीं काय? दुष्काळ फंडाकडील १ कोट १० लक्ष या तुटीकडे लावण्याचा संकल्प पायो निअरच्या बातमी प्रमाणें सरकारच्या मनानें खरोखर केला काय? आणि एवढ्या संकटा- च्या, हरण काळजीच्या व कष्टमय प्रसंगा- च्या वेळीं विलायती कपड्यावर जकात बसवूं नये अशी सरकारास बुद्धि सूचते हें दुश्चिन्ह काय सांगतें? सालिना २९ पासून २८ कोटींचा कपडा विलायतेहून येतो आणि त्यावर जकात बसविली तर दीड कोट रुपयां- ची तूट भरून येण्या सारखी असून सरकार जकात आकारीत नाहीं! या अत्याचारा बद्दल इंडियाचे तीस कोट प्रजाजन व विलायतचे न्यायदर्शी, सत्वशील व उदारचरित मुत्सद्दी इंडिया सरकारचा जबाब घेतल्या शिवाय राहणार नाहींत अशी आह्मास पक्की खात्री आहे. सर्व देशभर प्रस्तुत जकाती संबंधानें हालचाल फार जोरानें होत आहे तेव्हां न्यायाचा सूर्य उगवेल व सत्याचा विजय होईल असें आह्मी ह्मणतों. सभा भरवा, अर्ज करा, व वर्तमानपत्रांतून अखेर निकाला पर्यंत लढाहीच आह्मी आमच्या लोकांपाशीं विनंती करितों.

इंग्लंडचे मुख्य प्रधान मि० ग्लाडस्टन यांनीं आपले कामाचा राजिनामा दिला आणि लार्ड रोझबरी यांस मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें मिळालीं. लिबरल पक्षाच्याच हातीं राज्यसूत्रें राहतील आणि लार्ड रोझबरी यांस उभयपक्ष अनुकूल असल्यामुळें त्यांची नेमणूक कोणास रुचणार नाहीं असें नाहीं. नवीन प्रधानमंडळ नेमिलें त्यांत हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी नामदार हेनरी हार्टले फाउलर हे झाले असून अंडर सेक्रेटरी मुंबईचे माजी गव्हरनर लार्ड रे हे होत आहेत. ही अखेरची निवड या देशाच्या लोकांस फार आवडेल आणि लार्ड रे हे या देशाच्या बतीनें पार्लमेंटांत बडे मुत्सदी व अधिकारी आहेत असें पाहून आंग्लो-इंडियन पत्रकर्ते फार दुःख करतील.

इंग्लंडचे वृद्धपितामह ग्लाडस्टन साहेब आपल्या वयाचे ८६ वे वर्षा पर्यंत एक सारखे ६० वर्षें स्वदेशाचे हितासाठीं देह झिजवीत आहेत हें सांगितलें ह्मणजे त्यांचे चरित्राची सारभूत गोष्ट तत्काळ लक्षांत येईल. आपल्या घरादाराच्या पलिकडे संसारी मनुष्याचे कांहीं कर्तव्य आहे, हें ध्यानांत ठेवण्या सारखें आहे. किंबहुना देशकार्या साठीं आयुष्य खपविणें हें संसारी मनुष्याचें पहिलें कर्तव्य अहे. आपला देश सुखी, शांत व स्वस्थ असला तर आपलें घरदार सुखी, शांत व स्वस्थ राहील हें विसरता कामा नये. आमच्या देशाचें राज्यकर्तृत्व परकीयांच्या हातीं असल्यामुळें आमच्या लोकांची स्वाभा- विक वृत्ती संकुचित झाली आहे. आपला देश सुरक्षित दुसऱ्यांनीं ठेवावा आणि नंतर आपण त्यांत घरदार सुरक्षित ठेवावें अशी आपली सांप्रतची स्थिती आहे. आपले राज- कर्ते प्रभुसत्तेनें उदार आहेत तेव्हां ते आपल्या सारखे आह्मासही करितील अशी आह्मास आशा आहे. आणि या बळकट आशा तंतूवर आमच्या स्थानिक स्वराज्याची व भावी राज्यकर्तृत्वाची इमारत उभारली आहे. लोकांनीं देशकार्यार्थ चंदना प्रमाणें झिजावें हाच धडा या अतुल, जगन्मान्य, व श्रेष्ठ पुरुषोत्तमाच्या चरित्रा पासून शिकाव- याचा आहे. यथाशक्ति प्रत्येकाचें पाऊल देशकार्याच्या मार्गी पडलें ह्मणजे पुरें आहे. ग्लाडस्टन सारखे पुरुष क्वचितच निपजतात. तलवारीच्या बळावर दिग्विजय केल्याचें आपण कधीं कधीं ऐकतों पण आपल्या विचारसरणीनें लोकांचीं मनें हस्तगत करणें हा दिग्विजय सर्वांहून फार मोठा होय. आणि तो ज्या अलौकिक नरमणीनें केला त्यांचें चरित्र सर्वत्र आदरणीय व मननीय होईल आणि लोक त्यापासून कांहीं अधिक गोष्टी शिकतील हें उघड आहे. असा हा जीवंत मूर्तिमान कित्ता ज्यांच्या समोर आहे ते धन्य व भाग्यशाली खरे! आमच्या मध्यें- ही अशीं नररत्नें कालगतीनें उदयास येतील असा सध्यांचा ओघ दिसतो. नामदार दादाभाई नवरोजी याच कोटींतले आहेत आणि ते आपल्या या आर्यभूमीचे आहेत ह्मणून आह्मास मोठी धन्यता वाटते.

मुंबई युनिव्हरसिटीच्या अभ्यासक्रमांत देशी भाषांचा शिरकाव करावा अशा विषयीं आजपर्यंत बहुत प्रयत्न झाले. त्या पूर्व श्र- माचें फळ आतां लवकर मिळेल असा रंग दिसतो. हल्लीं हा प्रश्न युनिव्हरसिटी पुढें आहे. परंतु देशी भाषा युनिव्हरसिटीच्या अभ्यासांत कशा घालाव्या या विषयीं मोठा- च विचार आहे.

खरोखर देशी भाषांचा उत्कर्ष होण्यास योजना अनेक झाल्या पाहिजेत. सरकार द- रबारांतून सध्या इंग्रजी वाचून पान हालत नाहीं. वास्तविक ज्या अधिकाऱ्यांनीं देशी भाषांतून कारभार ठेविला पाहिजे ते देखील इंग्रजींतच कामें चालवितात. इंग्रजीचा आप- ल्यास गंध आहे आणि इंग्रजींत आपण का- में चालवितो असें वरिष्ठास दाखविणें ह्मणजे एक बढतीचा मार्ग आहे. वकीलांस इंग्रजी येत नसलें तर त्यांचा धंदा चालत नाहीं. पुष्कळ सरकारी अधिकाऱ्यांस देशी भा- षांचा ओनामा देखील येत नसतो आणि अ- र्थांत त्यांचीं कामें इंग्रजींतच चालली हिजेत. अशा अंमलदारांस गत्यंतरच नाहीं. प्रथम सरकार दरबारांतून देशी भाषांचा फै- लाव झाला पाहिजे. इंग्रजी राज्यकर्त्यांची भाषा आहे पण तिचें स्तोम अलीकडे फार माजलें आहे. एस फेस केल्या वाचून शहाः ण्या मंडळींत कोणी नाणवला जात नाहीं. जातमोर्चो हरें इंग्रजींतून पडली आणि सर- कारपाशीं अन्य कोणत्याच भाषेचो मातबरी नाहीं. तेव्हां प्रथमतः देशी भाषांचा प्रवेश सरकारी कचेऱ्यांतून झाला पाहिजे.

इंग्रजी भाषेंत शब्दसंचय मोठा आहे. वि- चारसंग्रह इग्रजात अहे तेवढा जगांतील कोणत्याच भाषेंत नाहीं. ग्रंथसंग्रह देखील अति मोठा या भाषेंत आहे. तेव्हां अशा भाषेपासून आपल्या देशी भाषांच्या उत्कर्षा- स मोठा फायदा फायदा होईल. सांप्रतची देशी भाषांची स्थिती अशीं आहे कीं इंग्रजी भाषेंतील ज्ञानभाण्डाराला देशी पेह- राव दिला पाहिजे. आणि ही गोष्ट इंग्रजीच्या अध्ययना शिवाय साध्य नाहीं. त्या प्रमाणें देशी भाषांतला शब्दकोश मोठा करण्यास संस्कृत अध्ययनाचीही पूर्वी इतकीच जरूर आहे. सध्यां प्रमाणेंच इंग्रजी व संस्कृ- त अभ्यासांची व्यवस्था युनिव्हरसिटीनें कायम ठेऊन नंतर देशीभाषांचा समावेश केला पाहिजे.

म्याट्रीक्युलेशन परीक्षेस संस्कृत व मरा- ठी अशा दोन्ही भाषा अवश्य ठेवाव्या. त्या विकल्पें विद्यार्थ्यांच्या खुषीवर नसाव्या- त. पुढील परीक्षांतून ही देशी भाषांतून कां- ही विषयांचा परीक्षा होत गेली पाहिजे ह्मणजे. देशी भाषांतून ग्रंथलेखन विविध

शास्त्रीय विषयावर आपोआप हात जाईल. मराठी किंवा इतर देशी भाषांतून शास्त्रीय ग्रंथ नाहींत हें खरें परंतु जरूर पडली म्हणजे कांहीं तरी योजना सुचते आणि कार्यभाग साधतो.

# The Berar Samachar

MONDAY MARCH, 12, 1894

The finances of India are in a hopeless state. The Budget for 1894-95 shows a deficit of three crores and a half. Most probably there will be a larger deficit. The present calculations are based upon the rate of exchange that rules at present. Now when the export-trade is brisk and active the exchange is as high as possible. But in the long run of the next twelve months the chances are that exchange will sink to a lower level than the government rate of 1s. 2d. per Rupee. So we cannot vouchsafe for the accuracy and exactness of the Budget-accounts of Mr. Westland the Financier of the Indian Empire.

Whatever it be, we cannot hope to see a less deficit than three crores and a half. The next question arises as to how this want of money is to be met with. Under the present circumstances the people can not bear a further strain of taxation. They are already drained to their blood. The prospect of a net taxation is totally disappointing. The national resources are exhausted in all possible ways. The state finance stands on the brink of bankruptcy. In this helpless and despairing condition the idea of imposing duties on the imports of the nation is not a bad one. The expenditure ought to be curtailed. No doubt it is the best solution of the question but the moral force of argument does not gain much weight with the Government of India. No amount of sophistry will convince the people that the present deficit of 3.5 crores is due to the fluctuations in exchange alone. It is one of the causes. To it may be due one-half of the new burden of expenses. The Compensation Allowances have come up to something like two crores. The military expenditure, the frontier defences, the annexations and increasing expenditure in Civil departments have run along the heavy fall in exchange. The last decade has raised the expenditure from 71 crores to 92 crores. This is the way in which the English Government finances the state and one need not answer why the financial minister is going to reimpose the duties on the import trade of India. Mr. Westlawd has introduced a new Tariff Bill in the imperial Legislative Council. This bill will enable the Government to realize a revenue of 3 crores and a half. But it is mischievous in so far as it exempts Cotton Yarn and Goods from duties. This intentional omission cuts short the expansion of revenue by not less than one and a half crore of rupees. This wilful abandonment of a rich source of income is due to the dread of incurring the displeasure of the people of Lancashire. The wishes and interests of the latter are the determining factors in the questions of India's common weal. This significant and wilful omission in the Tariff Bill the whole nation will resent with just indignation. The moral ... of the Government on the minds of the ryots will be loose. No right-minded man will uphold such a bill. It is no sound principle of political economy to tax one thing and to exempt another. Besides the cry of the English manufacturers of cotton goods is a sham one. Their goods do not enter into competition with the Indian ones. The whole nation will protest against this omission. There will shortly be in circulation all the wheels of agitation and opposition. The platform, the press and the petitions will carry a crusade against the exemption of cotton, Yarns and goods. Let us hope for the best. And we trust to the goodness of the Government. It is high time for Lord Elgin to stick to his watch-word—"do your duty without fear, without favour and without selfishness."

Rumour is wide afloat and it is never so pregnant with truth as now. Neither Mr. Aitken nor Mr. Mahajani is going to be the Director of Berar. Rao Sahib Shitaram Vishwanath Patwardhan of Poona gets the post and with the mention of this startling news the whole story is told. We are not in a mood to hail the appointment because our disappointment is great. We do not know how to draw upon consolation with the *empty* patriotism of having secured a *native* after all. Rao sahib Patwardhan is a veteran officer of the Bombay educational department. We are not in touch with his educational attainments but we shall hope that his regime will be ennobling to the high renown of the Berar educational department. Mr. Aitken is done up for ever. He would not remain till he gets a third chance to fight out his case. With a heavy heart we shall have to bid him good-bye. Mr. Mahajani however need not despair. Though a dark cloud hangs over our head we catch a distant ray of hope and exult ourselves with the prospect that Mr. Mahajani will be the fourth native Director. With this consolation we shall prepare ourselves to welcome Rao Sahib S. V. Patwardhan within the next fortnight.

In connection with the crippled state of the Indian Exchequer the 'Hindu' of Madras remarks in a stirring and thoughtful expression that the unmanageable risks are being incurred and rash and desperate proposals are made,and there can be no doubt. Anything but the only true and effectual remedy is proposed to be tried. Vested interests do not allow the Government to undertake substantial reductions in the big departments; and the only course open is to increase the burden of taxation. And what is the extent of this increase? It is said that Mr. Westland will announce a deficit somewhere between five and ten crores of rupees, an amount which if obtained altogether from increased taxation would merely crush the people already groaning under an intolerable burden. But there is absolutely no chance of the situation improving during the current year. The rupee may go down below fifteen pence, and if every pound of delicit caused by declining exchange is to be made good by fresh taxation, the tax—payers will only be bled dry. The prospect is dreadful to contemplate, and the only hope lies in the heroic action of those statesmen on whom rests the responsibility for the well-being of the British Indian Empire.

The able and learned address of Dr. R. G. Bhandarkar is still ringing in our ears. The Vice chancellor rightly begins with the important question of the day viz the premature deaths of University-students. The longevity of students is the burden of his first song. He is extremely sorry for untimely deaths and tries to hit upon their causes. Want of nourishing food, absence of proper exercise and the custom of early marriage both of boys and girls are the causes and germs of the deaths of young men. We accept his decision but we do not think with him that the excuse of poverty is idle and sham. The new conditions of life and the hard struggle for bread force upon us a sort of abstinence from the wordly enjoyments of life. Want of nourishing food is a difficulty which it is very hard to remove. Proper exercise is a necessity which is being duly appreciated and the more it is pressed in such convocation addresses the better. Dr. Bhandarkar does not take a notice of the hard strain of mental labour which is put upon young minds. Is not the mill of University Examinations sufficiently grinding the energies and activities of the young generation? The Hindu of Madras will like to add a fourth cause that prevails in that presidency. Our contemporary advertises to the rampant evils of the drinking vice that prevails among the educated men thereof. Side by side with this we shall quote below from a London paper a para that summarizes the unhappy results of every—day marriages not excluding of course the main effects of early marriages:—

"If left to Nature the fittest would survive. But, as things are, the unworthiest increase mose rapidly. The ignorant and the improvident give the reins to their libidinous passions and threaten to overwhelm us with the "rapid multiplication of the unfit." Even those weighed down with hereditary or contracted diseases do not stint themselves. They marry and are given in marriage. Whereas the prudent and the wise practise restraint, and are cautious in the exercise of their creative powers. If it be true that the labour does not increase in proportion to the increase of population repressive measures will have to be adopted to prevent the breeding of those who are unfit. Nature sterilises women of immoral lives. Immoral men should be sterilised also; but this can only be done by artifical means. Jesus said some are born eunuchs, some are made eunuchs, and others have become eunuchs for the Kingdom of Heaven's sake. Origen emasculated himself. What has been done from religion, luxury, or choice may be done again from necessity. It might easily be made a physical impossibility for criminals, hereditary paupers, imbeciles, profligates, and others suffering from gross bodily or mental defects to propagate their failings and their vices. In no long time our prisons, work—houses, and asylums would be empty. Our lock hospitals would be swept away. Prostitution would become a forgotten calling. Pauperism would cease. Disease be almost unknown. By the same method which breeders adopt, race could be raised to the highest pitch of perfection and of excellence. The people who shall first have the moral courage to do this will take the lead among the nations of the world."

## वऱ्हाड.

हवामान— ऊन फार तापतें. रात्रीं थंडी पडते. हवा स्वच्छ असून आकाश निरभ्र असतें. अशा चांगल्या ऋतूंत देखील पटकीचा उपद्रव सुरू आहे.

राव बहादूर जठार यांस अकोल्याच्या नागरिक लोकांकडून टोलेजंग पानसुपारी होणार आहे. पण राव बहादूर आमंत्रण स्वाकारून मंडळीचे मनोरथ पूर्ण करितील तर सर्व नामी!

हायस्कूल मधील विद्यार्थ्यांच्या समारंभासही राव बहादूर जठार यांस निमंत्रण केलें आहे. परंतु रावबहादूरांस वेळ मिळून त्यांच्या मनानें समाजाचा गौरव करण्याचें घेतलें पाहिजे.

अकोल्याच्या रिकाम्या नायब तहशीलदारीच्या जागेवर मि. अबदूल अझान या नांवाच्या तरुण गृहस्थास औरंगाबादेहून आणिलें. वशिला कसा काय लागला व कमिशनरपाशीं कशी रामबाण गोळी लागली परमेश्वर जाणे!

रा. रा. बहिरव प्रसाद तहशीलदार यवतमाळ यांस तीन महिन्यांची रजा मिळाली आणि त्या रजेंत रा. रा. लक्ष्मण नारायण गोखले यांस तहशीलदार नेमिलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

कमिशनरचे सुपरिनटेंडट मि. न्यूटन मेरे हे तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर गेल्यामुळें त्यांच्या जागीं उमरावती डेपुटी कमिशनरचे हेडक्लार्क मि. सी. गाडफ्री यांस नेमिलें.

आणि हेडक्लार्कचे जागीं रा. रा. आबाजी नारायण सेकंडक्लार्क यांस नेमिलं. नेटिवावर ही मोठीच मेहरबानी!

मि. काटग्रेन्ह पोलीस सुपरिनटेंडट हे सहा दिवसांच्या किरकोळ रजेवर सिमल्यास गेले आहेत ते आज उद्या परत येतील आणि पुढील महिन्यापासून दोन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जाणार आहेत.

येथील, तालुका चिफ कान्स्टेबल रा. रा. विष्णु गणेश यांनीं पेनशन घेतल्यामुळें त्यांच्या रिकाम्या पडलेल्या जागीं ब्रह्मदेशाहून मि. धनसा साहेब या नावांच्या पार्शी गृहस्थांस आणिलें व त्यांजकडे कोर्ट इनस्पेक्टरचें काम सोंपविलें. पुष्कळ हक्कदार ठार बुडाले!

रा. रा. रामचंद्र आबाजी पन्हाळकर चार महिन्याची फर्लो फिना करून उमरावती हायस्कुलांत आपल्या कामावर रुजूं होण्यासाठीं गेले.

कप्तान कोल्व यांची औरंगाबादेस बदली झाल्यामुळें त्यांच्या जागीं वाशिमाहून मि. आर. सिम्पसन यांस बदललें.

कप्तान वारन हेस्टिंगस आणि कप्तान जे. जी. मारिस या उभय अंमलदारांस लष्करांतील 'मेजर' चे हुद्दे मिळाले.

NOTICE

The Akola Municipal Committee intend making a complete survey of the Municipal area of this town and services of a surveyor for one year, as a temporary measure, on Rs. 60 per month are required. Applicants to apply to the undersigned before the 31st march 1894 with testimonials if any.

Municipal Office, Akola 7—3—94

B. M. Sathe
Secretary
Municipal Committee
Akola

## वर्तमानसार.

ग्रेटब्रिटनांतून दरसाल सर्व जातींचें मिळून २९ कोट रुपये किंमतीचें कापड व सूत हिंदुस्थानांत येतें त्यावर आयातजकात शेंकडा ५ टके बसविली तर हिंदुस्थानच्या खाजिन्यास दरसाल १२९००००० रुपयें बिनाफत उत्पन्न येईल. या वेळीं खजिन्यांत तूट आहे तेव्हां अशी जकात बसविली तर बरेंच उत्पन्न होईल.

युरोपियन कामगारांस झालें तरी काय— एका मयत मनुष्याचें प्रेत नेत असतां 'हरी बोलो' असें एक मनुष्य म्हणत होता, त्यास बरहानच्या पोलीस सू. नें कैद केलें. पण त्याजवर गुन्हा कोणता ठेवावा या बद्दल पोलीसची कांहींच अक्कल चालेना, ह्मणून त्यांनीं एका वकिलास सल्ला विचारली. सगळे कायदे त्यानें धुंडाळले पण त्यावर गुन्हा ठेवण्या सारखें एकही कलम त्यांस सांपडलें नाहीं. धन्य आहे पोलीसच्या शहाणपणाची.

एका सोल्जरानें गोऱ्या कामगारांस गोळ्या घातल्या— आमदाबाद येथें असलेल्या लिनस्टर रेजिमेंट पैकीं कार्पोरल लोहरा यानें कारपेंटर्स, डोयली, रोज, आणि हूली या नाव कमिशनर आफिसांस गोळ्या घातल्या, पैकीं डोयली मेला, रोज मरण्याच्या स्थितींत आहे, आणि हूली आजारी आहे. आतां लोहरा याचा न्याय कसा काय होतो हें दिसेलच.

खजिन्यांतील तूट— येत्या बजेटांत खजिन्यांत बरीच मोठी तूट पडणार आहे ती भरून काढण्यासाठीं लष्करी खर्च गेल्या पांच सात वर्षांत अतिशय वाढला आहे तो, व होमचार्जीचा खर्च कमी करावा. या उपायानें ती भरून नाहीं आली तर बाह्य देशांहून येणाऱ्या तलम कापड सुतावर आयात जकात बसवावी; तरी ही तूट भरली नाहींतर हल्लीं ५०० रुपयांपेक्षां जास्त उत्पन्नावर कर घेण्याची जी मर्यादा ठेविली ती वाढवून १२०० रुपये करावी, आणि इन्कम ट्याक्स वाढवावा असा प्रेसिडेन्सी असोशियेशन सभेनें हिंदुस्थान सरकारास अर्ज केला आहे.

अमिरी शिक्षा— अमिराची डाक आणि व्यापाऱ्यांचा माल चोरल्याबद्दल तीन मनुष्यावर शाबिती झाल्यामुळें त्यांस तोफेच्या तोंडीं देण्याची शिक्षा अमिरानें दिली व ती अमलांतही आली.

अमीर यात्रेस जाणार— प्रकृतीस आराम नाहीं तेव्हां यात्रा करून हवा पालटावी असा अमीराचा विचार आहे. या हेतूनें मक्का मदिना व इतर पुण्यक्षेत्रें पाहण्यासाठीं जावें असें अमिराच्या मनांत आहे, व आपल्या मागें अफगाणिस्थानचा राज्यकारभार आपल्या मुलानें पहावा. आपल्या मुलाचें वजन कितपत बसतें हें पाहण्यासाठीं आपल्या मुलास जलालाबादेस पाठविलें होतें असें जलालाबादेकडील वर्तमान पत्रावरून समजतें.

इंग्लंडच्या ब्यांकची शिलक— इंग्लंडच्या ब्यांकेपाशीं २२६ लक्ष पौंड ह्मणजे ३९ कोट रुपयांपेक्षां जास्त शिलक आहे. इतकी शिलक त्या ब्यांकेपाशीं पूर्वीं कधींही नव्हती असें म्हणतात.

एक नवी रेल्वे— पांचपाद्रा येथून कराचीपर्यंत ८० मैल नवी रेल्वे करावी असा जोधपूरच्या महाराजांचा विचार आहे. ही रेल्वे करण्यासाठीं एक भाग १०० रुपयांचा ठरवुन ८० लक्ष रुपये भांडवल मारवाडच्या लोकांपासून जमवावें असा त्या महाराजांचा बेत आहे ह्मणतात. गु० सू०

मुंबईचीं तटबंदीचीं कामें परशत्रूचा हल्ला झाल्यास त्यावेळीं बचावाच्या कामास कितीं उपयोगीं पडतील हें अजमावून पाहण्याकरतां मागच्या आठवड्यांत जी एक लटकी लढाई झाली त्या अनुभव पाहाण्याच्या लढाईवरून तीं कामें चांगल्या रीतीनें उपयोगीं पडण्यासारखीं नाहींत असें त्या शास्त्रांत प्रवीण असणाऱ्या अशा कित्येकांचें म्हणणें असल्याचें बाहेर आलें आहे. यावरून लाखों रुपये खर्च करून तयार केलेल्या त्या कामांत सुधारणा व फेरफार करण्याचा विचार चालू होईल असें दिसतें! तसें झाल्यास ही एक नवी खर्चाची बाब होईल.

सरकारी नोकरींत असलेल्या कराचीच्या एका तरुण गोऱ्यानें, दुसऱ्या एका तरुणीवर आपलें मन बसलें असून तें सफळ होण्याची आशा नाहीं असें पाहून वीष खाऊन आत्महत्या केली.

पुण्याच्या एका गोऱ्या सोल्जरानें वस्तऱ्यानें आपला गळा कापून घेऊन आत्महत्या केली.

पोर्ट अलिबाब येथें पटकीचा जारा सुरू झाला असल्यामुळें पटकी न होण्याकरतां माणसास टोंचणारे प्रोफे० हाफकीन हे तिकडे गेले आहेत.

अमिराकडे जाऊन आलेले सर डुरंड यांस नाइट कमांडर आफ धी स्टार आफ इंडिया हा किताब दिला.

आफ्रिकेंतल्या इंग्रजी फौजेनें, गुलामांचा व्यापार करणाऱ्या एका राजावर एक हल्ला केला व त्यांत त्या फौजेचें फार नुकसान झालें. या चाल करून जाण्यानें दोन खेडीं हस्तगत झालीं, पण शत्रूंनीं पहुकडील हल्ला केल्यानें माघारें यावें लागलें. या कामांत तीन इंग्लिश लेफटनेंट कामदार व १० शिपायी इतके ठार होऊन दुसरे पांच सहा कामदार व ३० लोक जखमी झाले.

आफ्रिकेंत माटाबल येथें इंग्रज लोकांच्या ज्या कांहीं खटपटी चालल्या आहेत त्याची मुळची हकीकत चमत्कारिक आहे. पूर्वीं हिंदुस्थानांत जशी इस्ट इंडिया कंपनीस एक सनद दिली होती त्याचप्रमाणें एका इंग्रज कंपनीस आफ्रिकेंत सनद दिलेली आहे. त्या कंपनीस जेव्हां ही सनद दिली तेव्हां विलायतच्या राणीनें माटाबल राजा लोबेंगुला यास एक पत्र पाठवून आमची ही सनद कबूल करा असें लिहिलें. इतक्यांत त्या राजास दुसरें एक पत्र गेलें व त्यांत तुह्मी आपल्या सोन्याचा तुह्मीच व्यापार करा, वगैरे प्रकार लिहिला होता. हीं दोन्हीं पत्रें त्या राजास एकाच वेळीं पोंचलीं. त्या पत्रांची तपासणी करण्यांत हें राणीचें पत्र डगीच आहे असें राजास वाटलें आणि राजास राग येऊन त्यानें त्या कराराचा साक्षीदार व दुसरे कांहीं लोक यांस ठार केलें.

जर्मनी व रशिया यांच्या दरम्यान व्यापारासंबंधानें जो नुकताच तह झाला त्यामुळें जर्मन लोक अगदीं नाखूष झाले आहेत. जर्मनींतल्या शेतकरी लोकांच्याही मोठाल्या सभा होत आहेत.

आफ्रिकेंत इंग्रजी फौजेचा जो पाडाव झाला त्या कामावर जास्त फौज रवाना होत आहे.

खीवा व बुखारा या हद्दींत त्या त्या राजांच्या इच्छेवरून रशियन भाषेच्या शाळा सुरू झाल्या आहेत. हिंदुस्थानांत इंग्रजी शाळा सुरू होऊन आमचे लोक जसे पंडित बनले तसें आतां तिकडचे लोक रशियन भाषा शिकून मोठे पंडित बनतील व आमच्या प्रमाणेंच तेही धर्मलंड होतील.

रशिया आपली ट्रान्स कास्पियन रेल्वे हळू हळू पुढें वाढवीत आहे. न्यू मार्गिलन व ताशखंडपर्यंत आणण्याचा त्याचा उद्योग हल्लीं चालू असून पुढें फरगणा व तुर्कस्थान पर्यंत आणण्याचाही विचार आहे.

गव्हरनरजनरल हे ३० मार्च रोजीं कलकत्याहून निघून लखनौ, शाहारणपूर, देरादून, व मसुरी या वाटेनें १४ एप्रिल रोजीं सिमल्यास दाखल होतील. ठा० अ०

लार्ड रोजबरी यांनां मुख्यप्रधान नेमिलें.

प्रभासपाठण येथील चवकशी चालली आहे.

येवल्यास हिंदूंवर फौजदारी खटल्यांचा पाऊस पडत आहे!

मि. विलियम ईवर्ट ग्लाडस्टन साहेब यांनीं आपल्या लिबरल पक्षाच्या प्रधानगिरीच्या कामाचा राजिनामा राणीसाहेबांस देऊन आपण आपल्या जबाबदारीपासून मुक्त झाले. प्रधान मंडळाचे कौन्सल राणी साहेबांच्या महालांत बोलावून तेथें सर्वांसमक्ष आपल्या हातांतील राज्य सुत्राची दोरी राणीसाहेबांच्या हातीं दिली. यांच्या वयास वयास आज सुमारें ८६ वें वर्ष लागलें आहे व यांपैकीं सुमारें ६० वर्षें पार्लमेंटरी कामांत गेलीं व त्यांपैकींच सुमारें ४० वर्षें मोठमोठ्या जबाबदारीच्या कामांत गेलीं. हे पहिल्यानें मोठे टोरी होते, ह्मणजे पूर्वापार जें चालत आलेलें आहे, त्यांत फेरफार न करतां तें तसेंच चालू द्यावें अशा मताचे ते प्रथम होते ह्मणून कांहीं चारित्रकारांनीं हे २६ वर्षें टोरी २६ लिबरल व बाकीचीं ह्मणजे अलीकडील ८।१० वर्षें अगदीं राडिकल मतांचे होते असें ह्मटलें आहे. सारांश एकंदरीनें पहाता आज ज्या मनुष्याच्या वयास ८६ वर्षें झालीं व ज्यानें ६० वर्षें आपल्या देशाच्या हिताकारतां नांवा लौकिकांकरितां व सौख्याकरितां आपल्या वयाचे इतके दिवस व आपली सर्व विद्वता व आपले परिश्रम खर्ची घातले त्यांस लोकांच्या मान्यतेपेक्षां ज्यास्त मोठें भूषण लोकांनीं काय द्यावें. असे पुरुष ज्या राष्ट्रांत होतात तें राष्ट्र धन्य व ते लोकही धन्य. सु. प.

औषधी माहिती— दांतसर्पास उपाय. कडू भोपळ्याचा मगज, कंवडळाचा मगज, करडोलीचा कंद, पोफळाची साल, कोहळ्याची साल हीं सर्व चूर्ण करून तें गुरगुडींत घालून ओढावें. दि. ५ अथवा ३. दांत दुखतात व हालतात त्यास. रुमा मस्तकीचा खडा दाढेखालीं धरावा. डब्यास— कडू भोंपळ्याचा रस द्यावा. मूळव्याधांवर लेप.— मोरचूत भाजून तोळा १, मुरदाडशींग तोळा ?, कापूर तोळा १, निंबूसे खलून, गोळी करून निंबू रसांत उगाळून लेप करावा. मोड गळून पडतोल.

आळंदी येथील देवाचे दागिने त्यांच्या पुजाऱ्यांनीं पटकावल्याबद्दल त्यांच्यावर खटला होऊन, त्यांची खेडच्या दुसऱ्या मॉजिस्ट्रेटपुढें चौकशी चालली आहे. ब०

खरपूस उत्तर— "जशास तसें भेटे आणि मनीचा संशय फिटे" या ह्मणी प्रमाणें कृष्णगड (बंगाला) येथील जज्ज आफिसांत एक मौज झाली. एक दिसण्यांत प्रतिष्ठित दिसणारे मुसलमान गृहस्थ जज्ज साहेबांच्या चेंबरांत जाऊन नोकरी मिळण्याची त्यांणीं साहेबांस प्रार्थना केली; आणि अशी शिफारस सांगितली कीं, कलकत्ता स्माल्काज कोर्टांतील मि० हेंडले व त्यांचे बंधु हे दोघे युरोपियन गृहस्थ मुसलमान लोकांचे हितैषी आहेत, आणि ज्या पेक्षां मुसलमान लोक हिंदूपेक्षां ज्यास्त राजनिष्ठ आहेत, त्या पेक्षां मुसलमानांचे हक्काचा पहिल्यानें विचार होणें रास्त आहे. या प्रमाणें झाल्यावर जज्जसाहेबांनीं नोकरी मागण्या साठीं आलेल्या राजनिष्ठतेचा ढोल घालणाऱ्या मुसलमान गृहस्थास विचारलें कीं— तुह्मी ह्मणता तें खरें; पण लार्ड मेयो व चिफ् जस्टीस नार्मन यांचा खून करणारे इसम हिंदू होते कीं मुसलमान होते? हा प्रश्न ऐकतांच राजनिष्ठेचा टेंभा मिरविणारे मुसलमान गृहस्थ निरुत्तर होऊन तेंथून गाशा गुंडाळून एकदम चालते झाले, व एकांत हंशा पिकला!!!

राज्यक्रांतीचा प्रयत्न— सिसिली बेटांत राज्यक्रांती करण्याचा प्रयत्न कांहीं मंडळीनें चालविला होता. ही घाटाघाट फ्रान्सांत चालली होती, व त्याच्या मुळाशी रशिया असून जर बेत साधला, तर सिसिली नजीक एक बंदर घ्यावयाचें, असा रशियाचा बेत होता, असें उघडकीस आल्याचें रोमच्या तारेवरून समजतें.

श्रीगोकर्ण महाबळेश्वर— येथें पुढील चैत्र व० ९ पासून वै० शुद्ध २ पर्यंत मोठा उत्सव आहे. हा योग ६० वर्षांनीं एकदां घडून येतो. त्या वेळीं अमुलाग्र सर्व शाळुंका काढून पुनः विधिपूर्वक त्या शुद्ध करून बसवितात. हल्लीं त्या आत्म लिंगाचा जितका भाग दृष्टीस पडतो, त्या पेक्षां अधिक भाग ह्मणजे रावणाकडून लिंग घेऊन गणपतीनें ज्यावेळीं व ज्या स्थलीं स्थापना केली, त्या मूळ स्थळा पासून साग्र दर्शन होईल. आठ दिवस अनुष्ठान, होमहवन, ब्राह्मण संतर्पन रथोत्सव वगैरे समारंभ फारच मोठा व प्रेक्षणीय होईल हा अलभ्य लाभ भक्त जनांनीं दवडूं नये.

लष्करी किंवा नाविक खात्याचे उपयोगास लाविलेली इमारत किंवा अन्य मिळकत म्युनिसीपालिटीच्या कराच्या वगैरे कचाट्यांतून सोडविण्याचा अधिकार व्हाईसरायांस देण्या बद्दल एक कायद्याचें बील लौकरच कायदे कौन्सला पुढें येणार आहे असें कळतें.

पार्शांची दानत— मुंबईतील दिनाबाई पेटीट या श्रीमान् पार्शी बाईनीं कुटुंबांतील एका लग्नानिमित्त अनाथरक्षक फंडास एकंदर ३० हजार रुपये देणगी दिली! स. गो.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर " ७ " १८
किरकोळ अंकास ........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Six monthly............3 " 8 as.
Single copy.......................... 4as

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 8 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 19 MARCH 1894 NO 12

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १९ माहे मार्च सन १८९४ अंक १२

## सव नजरबंदाच्या माकडचेष्टांत ह्मणून पाडतां येतें.

मी रस्त्यांत जेव्हां लोकांहीं खात चालत असें तेव्हां लोकांना माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुम्हासही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असतें. परंतु तें सर्व चुकत होतें. मी रस्त्यात मला चालतांना लोकांच्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुष्यक्रमाचें पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्याप्रमाणें मी सुखी प्राणी होतो परंतु चार पांच वर्षांपूर्वीं मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वींसारखी माझी क्षुधा राहिला नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्काशय उमळून येई व जसें कांहीं बंडावा करून माझ्या हेतूस ह्मणून पाडी. हें मला अगदीं नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें निजायाला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असे. ह्यामुळें रात्रीं झोपेचा कल अगदीं बदलला झोंप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्यासारखें मला वाटे त्यामुळें मी केव्हां केव्हां आफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असें. मी जीभ पहातो तों तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सणटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यात भाला टोचल्यासारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसू लागले. आणि माझ्या दांता व हिरड्या सभोंवती कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दाताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्काशयांत घाणेरडा वायू उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निघून जाई. ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं ह्या वेळीं रस्त्यात चालत असता एकदम घेरी यावी, हलक वाटावें. आणि गरगर फिरल्यासारखें वाटून लोकांच्या देत चालावें व जमिनीवर सबशेल पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितके टाळता येईल तेवढें टाळून घेई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्रमंडळींनी व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं घेतलीं त्यापासून गुण न येता मी अगदीं सुदामदेव झालो. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असे मला वाटूं लागलें ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मांस थोडक्यांत निवेदन करतो कीं बरा कसा झाला ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिजेलचा रोगहारक सिरप (ह्मणजे माता सिजेलचा रोगहारक पाक) तुम्हांस फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं ह्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तरी थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधापासून इतका जल्द गुण आला कीं मला खातांना बरें वाटावें व झोंप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखीं चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविका सारखें [illegible] हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हां ताजा तवाना झालो व त्यामुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगता पुरेत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं जें सर्वांस होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतो व लागलीच मला त्यापासून आराम वाटतो.

ह्याचा तत्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होते परंतु खरोखर माता सिजेलचा क्युरेटिव सिरपात डोळ्यांत माती टाकण्यासारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगता येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच

मी तुमचा उपकार मानणारा
(सही) जे. सी. सिमसन
२१ ह्यानोवरचा रस्ता, न्यूकासल अंडर लाईन, स्टाफर्ड शिग्लन.

B T.

### NOTICE

The Akola Municipal Committee intend making a complete survey of the Municipal area of this town and services of a surveyor for one year, as a temporary measure, on Rs. 60 per month are required. Applicants to apply ra the undersigned before the 31st march 1894 with testimonials if any.

Municipal Office Akola 7—3—94 { B. M. Sathe Secretary Municipal Committee Akola

NEARLY READY

**CRIMINAL COURT MANUAL.**

*for the*
Hyderabad Assigned Districts
by
Mr. R. Obbard
assisted by
Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by [illegible] Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

वऱ्हाडसमाचार

मिति फाल्गुन शुद्ध १२ शके १८१५

लार्ड लान्सडौन यांचा पुतळा कलकत्यास बसविणार आहेत असें ऐकितों. पण हा पुतळा कोणत्या विजयाचा सूचक होणार तें परमेश्वर जाणे! ज्या बोलक्या चालत्या मूर्तीनें अखेरीस खालील प्रमाणें उद्गार काढले त्याची गणना कोणत्या देवगणामध्यें आंग्लो इंडियन करितील ती करोत पण आह्मांस तर असा पुतळा इंडियांत आला ह्मणून दुःख वाटतें. ते जाते वेळीं बोलले तें आम्ही विसरलों नाहीं :—

"इंडिया ह्मणजे एक प्रचंड नेटिव संस्थान आहे असें कल्पून इंग्लंडाला राज्य चालवितां येणार नाहीं. ब्रिटिश राज्यांत ही राज्यव्यवस्था साध्य नाहीं. पाश्चात्य कल्पनांचा पेला इंडियन लोकांनीं अनिवारपणें झोंकला व त्या कल्पनातरंगांत ते वाहवले तर आह्मी त्यांस ताळ्यावर आणण्यासाठीं आपली पराकाष्ठा केली पाहिजे आणि या कल्पनांच्या भरतीला प्रतिबंध केला पाहिजे. हिंदुस्थान सरकारचे अधिकार पार्लमेंटाच्या हातीं आणण्याविषयीं प्रयत्न चालला आहे तो सर्वांहून मोठा चुकीचा व भयंकर आहे प्रजासत्तात्मक राज्यसंस्था ज्या देशांत आहेत तेथें पार्लमेंटाला सर्व अष्टाधिकार असतात आणि अखेरची सर्व सत्ता पार्लमेंटाकडेच असते. ब्रिटिश अगर इंडिया सरकार यांच्या प्रत्येक कृतीबद्दल पार्लमेंटास जाब घेतां येईल. व्हाइसराय व स्टेट सेक्रेटरी यांस ही जबाबदारी ध्यानांत धरावी लागते आणि तसें केल्या शिवाय गत्यंतरच नाहीं. तथापि पार्लमेंटाला हा अधिकार पोंचतो ह्मणून तो अधिकार पार्लमेंटानें सदैव गाजवावाच असें कांहीं निष्पन्न होत नाहीं. आणि अलिकडे असा कल दिसतो कीं हा अधिकार सतत गाजवीत असावें व हें काम सामान्य जबाबदार नसलेल्या मनुष्याच्या ह्मणण्यावरून होत असतें. पण अशा करणीपासून ब्रिटिश राज्याला मोठा धोका पोंचेल. राजकीय विषय ज्यांस कळतात ते कबूल करितील कीं [illegible] सर्व विधायक सत्ता आपल्या हातीं ठेवण्याचा आहे तो परिणामीं अत्यंत भयंकर व विघ्नकारक होईल. इंडिया सारख्या निकालेल्या देशांतील सरकारची विधायक सत्ता हिसकावून घतली जात आहे हें फारच वाईट होय कां कीं येथील सरकारचे मंत्री वाकबगार व निष्णात असतात आणि मंत्रिमंडळाचा राज्यकारभार एका क्षणांत अस्ताव्यस्त व निरर्थक पार्लमेंटानें करावा ही मोठीच चूक आहे. पार्लमेंटांतील सभासद वरील मंत्र्याप्रमाणें माहीतगार व अनुभवी नसतात आणि मनोविकार व निवळ काल्पनिक विचार यांच्या जोरावर तेथील कामें अलिकडे फार चालतात. अशा व्यवस्थेंत मोठा धोका हा कीं इंडिया सरकारचे मंत्रिमंडळात सावकाशपणें व धीरावीरानें जे विचारांचे खल चालतात ते पार्लमेंटांत फार त्वरित उलथे पालथे होतात. आह्माला इंडियांत असतांना दीर्घकाळपर्यंत बारीक चौकशी चालवून माहिती मिळविल्याशिवाय कांहींच महत्वाची गोष्ट करितां येत नाहीं. सरकारी निरनिराळ्या खात्यांतील अधिकाऱ्यांची सल्ला मसलत घ्यावी लागते. तपशीलवार व चौकस दृष्टीनें सर्व टीपणें तयार करावीं लागतात, स्थानिक सरकारचे अभिप्राय विचारले पाहिजेत आणि नंतर त्यांच्या सूचना सहित ठाकठ गोळा बेरजेनें निराळा मसुदा करावा लागतो. आणि नंतर त्या मसुद्यावर स्टेट सेक्रेटरीला मंजूरात विचारावी लागते;" इत्यादि हे विचार आम्ही मुद्दाम आज येथें दिले आहेत. कांहीं काळानें या सर्व म्हणण्या बद्दल सरकारची पार्लमेंट मार्फत योग्य कान उघाडणी होईल अशी उमेद आहे. जों जों आंग्लो-इंडियन

असे अनुदार विचार प्रकाशित करितात तों तों ते त्यांच्या तोट्यास कारण होणार आहेत. अशा विचारप्रदर्शनानें लोकमत क्षुब्ध झालें आहे आणि त्या विचाराअन्वयें ज्या वेड्यावांकड्या कृती घडल्या त्याही आमची राजकीय बाजू जोरदार होण्यास अप्रत्यक्ष कारणें होत आहेत.

---

हुंडणावळीचा भाव उत्तरोत्तर उतरतच आहे. एका शिलिंगाला एक रुपया असा भाव होईल अशी भिती आहे. या भावाच्या निकीरी मुळें दमल्या मुळें पायोनियर पत्रकर्ते या आंग्लो-इंडियन चळवळीस नेटीव लोकांनीं साह्य करावें ह्मणून आमंत्रण करीत आहेत. या बोलावण्याचा अव्हेर करून मद्रासच्या 'हिंदु' पत्रकर्त्यांनीं एक खरमरीत उत्तर दिलें आहे. युरोपियन लोकांच्या तद्वाच्या वर्तनाला त्यांनीं एक उत्तम दृष्टान्त दिला आहे तो असा. दोघा मनुष्यांनीं एक गाय विकत घेतली. एक भोळा होता तो तिच्या सुंदर रूपाला पाहून ह्मणाला कीं आमच्या वाट्याला या गाईचा पुढला भाग पुरे. दुसरा लबाड होता तो ह्मणाला कीं आपण मागला भाग संभाळतो. शेण वगैरे घाण काढावी लागली तरी तें पतकरतों. पहिल्यानें तिला खाऊं घालावें व दुसऱ्यानें तिचें दूध काढून चैन करावी. नुसतें रूपाला पहिला भूळला पण कांहीं काळानें त्याची थैली रिकामी झाली. दुसऱ्याची चैन चालूंच होती. पुढें दोघे हिशोब करूं लागले तेव्हां दुसऱ्यानें आपल्याला फार काम पडतें ह्मणून गाऱ्हाणें [illegible] त्याला थोडें दूध द्यावयास तो कबूल झाला परंतु गाईवरचें स्वामीत्व त्या भोळ्या मनुष्यानें सोडावें असा करार ठरला आणि अशा फसवणूकीनें सर्व गाय शराकतीच्या व्यापारांत दुसऱ्यास मिळाली. असला व्यवहार इंग्रजांनीं आमच्या लोकांशीं मांडला आहे. हिंदुस्थानरूपी दुधाळ कामधेनूची कांस कांहीं या आंग्लो-इंडियनांनीं सोडली नाहीं. होमचार्जेस इंडियावर लादले, हुंडणावळीची मनोती पगारावर आकारून उपटली आणि वाटेल तसा खर्च चालविला आहे! या कामधेनूची कास आटली हें त्यांच्या लक्षांत आल्याबरोबर नेटीव लोकांस स्वतांच्या फायद्याच्या चळवळींत बोलावीत आहेत. देशाच्या खजिन्यांत कवडी जमा नाहीं अशा वेळीं ही लूट त्यांनीं चालविलीच आहे. नेटीव मुत्सद्दी ह्मणतात कीं इंग्रजी राज्यकारभाराचा हा मोठा बोजा इंडियावर लादूं नये. हा उपाय जर राज्यकर्त्यांनीं केला तर या देशाची संपत्ती वाढेल, इंग्रज लोकांची चैन चालेल आणि विलायतचा नांवलौकीक कायम राहील. तसें वर्तन केलें नाहीं तर काय होईल हें व्यक्त करून सांगण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

---

सुहृत् समाज या नांवाची संस्था आज सुमारें ३ वर्षें उमरावतीस आहे. या संस्थेचा उद्देश समाजांतील समासदांची मानसिक उन्नति हा आहे. मानसिक सुधारण्यास दोन मुख्य मार्ग. एक वाचन व दुसरा वादविवाद या दोन्हीही मार्गाचें अवलंबन समाज आपल्या शक्तीप्रमाणें आपल्या अंगावर घेत आहे. समाजांतील सभासदांस वाचण्यास वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व इतर कांहीं पुस्तकें मिळतात. या शिवाय दर आठवड्यांत वादविवाद होतो. या संस्थेचे संबंधानें दुसरी एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती ही कीं या वादविवादाचे वेळीं सभासदांस सभासद राहणें असल्यास महिन्यांतून २।३ वेळ राहणें नियमाप्रमाणें भाग आहे. याप्रमाणें न झाल्यास समाजांतून लोकांस आपलें अंग काढून घ्यावें लागतें. समाज अजून आपले बाल्यावस्थेंतच आहे. नुकतेंच कुठें त्याला पाय फुटून तो चालूं लागला आहे. एकंदरींत उद्योग स्तुत्य व अनुकरण करण्यासारखा आहे यांत कांहीं संशय नाहीं.

या समाजाचा वार्षिक समारंभही मनोज्ञतिपरच असतो. वार्षिक समारंभाचे वेळीं पांच चार सभ्यगृहस्थांस व्याख्यानें देण्याकारितां विनंती करण्यांत येते व या प्रमाणें ३।४ दिवस व्याख्यानें चालतात. यामुळें शिकलेले सवरलेले लोकांस परिश्रम करून आपले विचार लोकांस कळविण्यास व इतर लोकांस असे विचार ऐकण्यास चांगलीच संधी मिळते. याप्रमाणें या समाजाचे वार्षिक समारंभापासून लोकांचाही चांगलाच फायदा होतो. यंदाचा वार्षिक समारंभ ता. ८ मिनहू रोजीं सुरू होऊन ता. ११ रोजीं संपला. हा तिसरा वार्षिक समारंभ होता. यावेळीं एकंदर ५ व्याख्यानें झालीं. या पैकीं २ दोन अर्थ शास्त्रांतील विषयीं संबंधानें होतीं. एक कवितेचे संबंधानें होतें. राहिलेलीं दोन हीं सामाजिक विषयांचे संबंधानें होतीं.

---

√ जकातीचा कायदा इंडिया कायदे कौंसिलांत बहुमतानें पसार झाला. पण या कायद्यांत विलायती कपड्यावर जकात बसविली नाहीं. सरकारी कामगाराच्या नात्यानें जे कौंसिलदार होते त्यांच्याच मतांच्या जोरानें व अधिक संख्येनें हा कायदा पसंत ठरला. सरकारची बाजू राखली पाहिजे ह्मणून सरकारी कौंसिलदारांनीं उचल घेतली आणि हा कायदा निर्माण केला. या कायद्यानें खजिन्यांतील साडे तीन कोट रुपयांची उणीव भरली जात नाहीं ती नाहींच. हिंदुस्थानांतील गिरण्या मधून लागणाऱ्या विलायती पदार्थांवर जकात बसविली आहे आणि त्यामुळें आमच्या गिरणीवाल्यांचें फार नुकसान होत आहे. गोरगरीब राकेल तेल वगैरे जे स्वस्त पदार्थ वापरतात त्यांवर दुप्पट जकात बसवून सर्व अक्षम प्रजेवर जकातीच्या रुपानें हा अप्रत्यक्ष कर बसविला आहे. म्यानचेस्टरच्या लोकांस भिऊन विलायती कपडा जकातींतून गाळला ही गोष्ट हिंदुस्थान सरकारास लाजीरवाणी आहे. तीस कोट प्रजेचे कल्याणावर पाणी सोडून म्यानचेस्टरच्या लोकांची बाजू संभाळली हा अन्याय राज्यकर्त्यांच्या चांगुलपणाला काळिमा आणतो.

विशेष नवलाची गोष्ट या प्रकरणांत ही कीं आंग्लो इंडियन या वादांत मोठ्या कळकळीनें नेटीव लोकांमध्यें मिसळतात आणि सरकारच्या पक्षपाती, नीतीविध्वंसक, व विनाशकारक कायद्याला नांवें ठेवतात. नेटीवांच्या कल्याणा साठीं म्हणून ते असें एकमतानें वागत नाहींत. स्वतांचें पोट दुखतें म्हणून ते ओवा खात आहेत. विलायती कपड्यावर जकात बसविली तर सर्वजण या कराचे भागीदार आहेत. ही जकात न बसविली तर कदाचित हुंडणावळीच्या मनोतीला फांटा मिळून सरकारी पगारदारांचें नुकसान होईल अशी दहशत आहे. कदाचित उत्पन्ना वरील कर वाढविला तरी आंग्लो इंडियन त्या सांपळ्यांत अधीक सांपडतात. अशा बिकट प्रसंगांत ते अडकले ह्मणून एकीकडच्या आडांत न पडतां व दुसरीकडे विहिरींत न बसतां मोठ्या बेतावातानें ते सरकारा विरुद्ध नेटिव लोकांसह कल्होळ माजवीत आहेत.

तात्पर्यांवर दृष्टी देऊन आह्मी आंग्लो-इंडियनांस या वादांत आपणा मध्यें गणतो. सर्व देशभर चळवळ उडाली आहे. सरकारचा पाया चुकीनें गैरमार्गांत पडला असेंच नाहीं तर डोळे उघडून बुद्धिपुरस्पर खऱ्याखऱ्या गोष्टी सरकारनें लपविल्या आणि कांहीं ढोंगानें आपली दुर्बळता, परस्वाधीनता, व सत्यपराङ्मुखता जगास दाखविली. राज्याचा पाया नीतीमत्तेवर आहे. तलवारीच्या धारेवर राज्यें चालत नाहींत. लोकांचा विश्वास राज्यकर्त्यांवर राहिला नाहीं. सरकारचा भरंवसाच लोकांस येत नाहीं. हीं चिन्हें फार वाईट!

लोकमत या वादामध्यें द्विधा नाहीं. सर्वजण एक विचार सांगतात. या अफाट राष्ट्राच्या चाऱ्ही दिशा सरकार विरुद्ध उठल्या आहेत. शहरो शहरीं सभा भरतात, प्रचंड आवेशाचीं भाषणें होतात आणि लोक अर्जावर अर्ज धाडीत आहेत आणि सरकारास जागृत करीत आहेत. मद्रास, कलकत्ता, मुंबई, पंजाब वगैरे सर्व मुलखांत प्रचंड व टोलजंग सभा भरल्या व भरत आहेत. आणि या कायद्या संबंधानें अखेर मजल मारावयाची असा सर्व राष्ट्राचा संकल्प आहे. कांहीं गोष्टी निकराला पोंचविल्या शिवाय लोकमताला स्थैर्य व बळकटी येत नाहीं. हिंदुस्थान सरकारचे हातपाय पार्लमेंटाकडून तोडविले पाहिजेत आणि त्याच्या शिवाय गत्यंतर नाहीं.

या ऐन आणिबाणीच्या वेळीं वऱ्हाडची सार्वजनिक सभा स्वस्थ व निद्रिस्त आहे. वऱ्हाडच्या मुख्य मुख्य लोकांत कांहीं राम नाहीं असें ह्मणावें लागतें. ही मौनव्रताची वेळ नाहीं. रावबहादुर विष्णु मोरेश्वर भिडे, चेअरमन सार्वजनिक सभा पुणें यांनीं आमच्या प्रांतस्थ लोकांस विनंती केली आहे कीं जाहिरसभा भरवून हिंदुस्थान सरकाराकडे तार अवश्य व अगत्य पाठवाव्या. हा पुणेकरांचा निरोप आह्मी मोठ्या आनंदानें सर्वजणांस कळवितों आणि पुण्याच्या सार्वजनिक सभेचे आभार मानून वऱ्हाडचे लोक यथाशक्ति जाहीरसभा भरवून आपलें कर्तव्य बजावतील अशी उमेद बाळगतों.

---

लोकमताचा विजय सर्वत्र सुधारलेल्या राष्ट्रांतून होत असतो. इंग्लंडच्या कामन्स सभेनें जे कायदे करावे ते लार्ड सभेनें समूळ विलयास पोंचवावे अशी लढाई उभय सभांतून आज कित्येक वर्षें चालली आहे. आयर्लंडचें 'होमरूल' बिल लार्ड सभेनें स्वल्प काळांत टकारून दिलें. या बिला प्रमाणेंच दुसऱ्या कांहीं बिलांची व्यवस्था लार्ड सभेनें लाविली. प्रधान मंडळाचा असा पाडाव झाला आणि कामन्स सभा निर्बळी होत चालली. इंग्लंडच्या लोकांस हें सहन होईना. नामदार लाबोचर नांवाचे एक विख्यात पत्रकर्ते व पार्लमेंटचे सभासद आहेत. त्यांनीं आपल्या पक्षाची बळकटी लक्षांत घेऊन एक सूचना आणिली कीं, लार्ड सभेला कामन्स सभेचे कायदे नामंजूर ह्मणून परत पाठविण्याचा अधिकार आहे तो काढून घेतला जावा. अशी सूचना येतांच ती मोठ्या खडाजंगीनें पसार झाली. १४७ मतें अनुकूल व १४५ विरुद्ध होतीं. लोकमत या सूचनेनें दर्शित झालें व लार्ड सभेच्या अस्तित्वावरही कदाचित घाला पडेल. प्रजासत्तात्मक राज्यव्यवस्थाच परिणामीं हितावह होऊन लोकमताच्या सदासर्वकाळ जयदुंदुभी वाजतील! हिंदुस्थान देशाला असा काळ केव्हां येईल?

---

कैलासवासी नामदार न्यायमूर्ती काशिनाथ त्रिम्बक तेलंग यांच्या नामस्मरणार्थ एका त्यांच्या निवळ, गुणग्राही व श्रीमान मित्रानें गुप्तपणें सहा हजार रुपये मुंबई युनिव्हरसिटीस दिले. अशा गुप्तदानाचा दाता आपलें नांव कळवूं इच्छीत नाहीं. युनिव्हरसिटीनें ती देणगी आनंदानें स्वीकारली आणि तिच्या व्याजांतून एक सोन्याचें पदक एम. ए. परिक्षेंत 'इतिहास व तत्वज्ञान' या विषयांत पहिला उतरेल त्या विद्यार्थ्यास देण्याचें ठरविलें. तेलंगाच्या नामसंत्राचें हें पदक युनिव्हरसिटींत नवीन आलें ही परम संतोषाची गोष्ट होय. तेलंगाच्या अद्वितीय गुणसमुच्चयाची दर्शक वैजयंती पाहून त्यांचे [illegible] विषयीं अनुकरणबुद्धि युनिव्हरसिटीच्या मंडळींत प्रेरित होईल हा मोठाच फायदा झाला. गुप्तदानाचा हा कित्ता जनसमूहास फार आवडेल.

---

## OURSELVES

We request our subscribers will allow us the usual Shimga Holidays which they have hitherto done ungrudgingly. As our offices will be closed for the holidays there will be no paper issued next week.

---

The Berar Samachar

MONDAY MARCH, 19, 1894

The week that ended was one of immense excitement in the Parliament. At length the "ending or mending" of the House of Lords has absorbed the mind of the Lower House. On the 14th Instant Mr. Labouchere carried a motion that the Lords have no power to oppose to the bills of the Commons. This was certainly what might have been expected. The majority in favour of the proposition was only two. Yet a bare majority is an unfailing indication that the public mind is preparing itself against a domination whose undue interference has long retarded progress. This effort to shake off a yoke imposed by time-honored custom has some bearing on the aspects of our own country. In the present financial crisis nothing will better enable the Parliaments to have their way out and and carry solution of the problem than by introducing the long proposed and long

# नोटिसा

## नोटीस.

रा. रा. गणपतसा वा नारायणसा लाड राहणार डोणगांव ता० मेहेकर नि० बुलढाणे यास खालीं सही करणार यानकडून नोटीस दिली जाते कीं तुह्मी आमचे दुकानांत खातें संवत १९३७ सालांत मिती कार्तिक शुद्ध १ रोजीं घातलें व त्या खात्यांत देणें घेणें मिती फाल्गुन व. १४ संवत १९३७ पासून सुरु झालें. तें खातें संवत १९३८ चे फाल्गुन व. १२ च्या नावेंचें कलम व संमत १९४९ चे चैत्र शु. १९ पावेतों जमेचें कलम असें जमा नावे कडे कलमा सुरु राहून त्या मितीपासून आजपावेतों तहकूब आहे सदरहू मितीस तुमचेकडे आमची बाकी तुमची जमा वजा जाता रकम रु. ८८६॥≡॥ मुद्दल निघते. ही बाकी आह्मी तुह्मास अनेक वेळां पत्रद्वारें व मुद्दाम शिपाई मजुरीचा असे तुमचेकडे पाठवून मागणें केलें परंतु आपण श्रीमान असल्यामुळें सदर्हू आमचे पत्राचा व माणसाचा वारासुद्धां आपणास लागला नाहीं मग आमची रकम व्याजासुद्धां पाठविण्याचें स्मरण आपल्यास उघडच राहणार नाहीं सदरहू देवघेवीचे दरम्यान तुमचेकडून आह्मास मुंबईच्या हुंड्या आल्या त्या आह्मी मुंबईस पाठविल्या असतां स्वीकारल्या गेल्या नाहींत. सदरहू हुंड्या स्वीकारल्या नाहींत याचें कारण आह्मास कळण्या करितां आह्मी आमचे दुकानचा मुद्दाम कारकून चौकशीस पाठविला तर त्यांत असा प्रकार दिसून आला कीं हुंड्या तुह्मी खोट्या लिहिल्या. त्या हुंड्य आतां हाल आमच्या जवळ आहेत. आतां तुह्मास आह्मी विनयपूर्वक प्रार्थना करितों कीं तुह्मी व आह्मी दुकानदारीचे नात्यानें बंधु बंधु असल्यामुळें तुमची मानमान्यता इज्जत कायम ठेवणे हें आमचें काम आहे करितां मेहेरबानी करून मुद्दल रुपये ८८६॥≡॥ १०९ व्याज दरमहा दर शेकडा एक रुपया प्रमाणें आजपावेतों जें होईल तें व नोटीशीचा खर्च व खोट्या हुंड्यांची नकराइ शिकराईचा जो योग्य खर्च होईल तो अशी सर्व रकम तुह्मी आह्मास ही नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसांत अदा करावी तसें न झाल्यास आह्मी शेवटीं लाचार होऊन खोट्या हुंड्या देऊन आह्मास फसविलें व तुह्मी दगाबाजी केली याची फौजदारींत तुमचेवर फिर्याद व रकमेची व्याजाची व नोटीशीचे खर्चाची दिवाणी फिर्याद असे करावें लागेल व त्यांत तुमचे इज्जतीस धक्का बसून मोत्याचें पाणी गेलें ह्मणजे पुन्हा येत नाहीं व जगांत तुमची नालायकी होऊन परिणामी फार वाईट होऊन हातांतील गेलेला बाण पुन्हा येणार नाहीं व तुह्मी आह्मास दूषण द्याल व दोन्ही फिर्यादीचा खर्च भरून द्यावा लागेल व रकम व्याजासुद्धां शेवटीं तुह्मास द्यावी लागेल. करितां मुदतींत ह्या सर्व गोष्टीचा निकाल होईल हीच आशा आहे ह्मणून नोटीस दिली ता० १२-३-९४ इ.

( सही )

बापूजी जगन्नाथ साहू दुकान अकोला
तुळजापेठ तर्फे कुलमुखत्यार
गोविंद ओंकारी बिदके.

## नोटीस.

रा. रा. महादाजी वलद भवानी पाटील मौजे हिंगणे तर्फे म्हैसपुर तालुका आकोला यांस.

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हास आणि मजला उभयतांना गंगाधर व गुलाबराव व घाशीराम वगैरेंचें कर्ज देणें पैकीं गुलाबराव यांनीं शेतें जप्त केलीं व गंगाधर यानें ही शेतें जप्त केली वरून तुम्ही मजला असें सांगितलें कीं तूं मला मुखत्यारपत्र करून दे म्हणजे मी सर्वांचा बंदोबस्त करून देतो आणि तुजला अन्नवस्त्र देईन व तुजला बाहेर जाण्याचे काय पडणार नाहीं. वरून मी मुखत्यारपत्र पांच रुपयांचे स्टांपावर लिहून नोंदून वगैरे दिलें त्यास सुमारें वीस दिवस झालें त्याचा परिणाम मजला लवकरच समजून आला. माझीं शेतें सर्वे नंबर ७७ व ६१ आकार रुपये अनुक्रमें ५।≡।. व ३।०।० हीं घाशीरामानें वहित केलीं व त्याचा सारा चावडीवर दिला. तसेंच सर्वे नंबर ६६ आकार रुपये ३८॥।– हें गंगाधर कडे होतें त्याचा सारा त्यानें दिला. एकंदर तिन्ही शेताचा सारा ७५ ।≡॥ तुम्ही पाटील म्हणून तुमच्या कडे जमा असतां । तुम्ही त्या रुपयांची कशी काय विल्हेवाट केली कळत नाहीं. परंतु तुमच्या लपंडावीच्या गडबडीनें गंगाधर यांस मजसाठीं ५६८– पुन्हा देणें भाग झालें. मला तुमचा कारभार बिलकुल मान्य नाहीं. माझे बैलाची जोडी व बंडी एक दिवस करितां मागून नेऊन ती आज पावेतों परत केली नाहीं व खाण्या पिण्यास देत नाहीं. मला मजुरी करणें ती केलीच पाहिजे. या प्रमाणें तुमचें वर्तन दिसून आलें पुढें काय कराल त्याचा नेम नाहीं करितां दिलेलें मुखत्यार आज तारखे पासून या लेखान्वयें रद्द केलें आहे. वर नमूद केले प्रमाणें गाडी व बैल नोटीस पोंचताच परत करावें आणि तसें न केल्यास परत गाडीबैल होई पर्यंत दररोज एक रुपया प्रमाणें भाडें द्यावें लागून शिवाय मोडतोड तुमच्या अंगावर पडेल. तसेंच वर लिहिलेली रकम ५६८– तुम्ही व्याजा सुद्धा गंगाधर शेट यांच्या दुकानीं आठ दिवसांच्या मुदतींत पोंचती करावी. तसें न केल्यास फिर्याद करून पैसा सर्व नोटिशीचा खर्च व इतर अखेर निकाल पर्यंतचा खर्च या सह भरून घेतला जाईल. कळावें. तारीख १३ मार्च सन १८९४ इसवी.

( सही )

बनाई मर्द कृष्णाजी वस्ती हिंगणे
तालुके आकोला इच्या हातची
निशाणी बांगडी.

## नोटीस

रा. रा. नागू वा हिरामण पायरकर राहणार धोंगसी तालुके मुर्तिजापूर जिल्हे उमरावती यांस. खालीं सही करणार गिरजा इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मला आपल्या आईच्या घरीं पोंचविल्या वेळीं कांहीं किरकोळ [illegible] घातले. आणि सा गोष्टीस [illegible] फार [illegible] होऊन गेलीं. मला

आईच्या घरीं पोंचविलें त्या वेळीं माझे अंगावरील सर्व दागदागिना तुह्मी पूर्वींच काढून घेतला होता. राग शांत झाल्यावर मला बोलवाल व मजशीं संसार कराल अशी मला मोठी आशा होती. परंतु तुमच्या मनानें माझ्या विषयीं वाईट घेतलें आहे. मी तुह्मास नकोशी झाली आहे. मी आपण होऊन आपल्या घरीं दोन वेळ चालून आले. दोन महिन्यांपूर्वीं आले तेव्हां विऱ्हाड देखील मला मारुतीच्या मढीवर ठेवावें लागलें. दोन दिवस तेथें मला उपाशीं तापाशीं राहिले, व विनवण्या केल्या पण उलट तुह्मीं माझ्या बरोबर मला सासरीं वाळण्यास जे इसम आले होते त्यांच्याशीं मारहाण करण्याच्या बेतांत दिसला. नाइलाज होऊन मी आईच्या घरीं परतले. मी घरची गरीब आहे. पोटापाण्याची सोय नाहीं. आजपर्यंत तुमच्या नांवावर कर्ज काढून राहिले या उपर मला कोणी कर्ज देत नाहीं.

मी आपल्या बरोबर संसार करण्यास एका पायावर तयार आहे. माझें आयुष्य सर्व फुकट चाललें आहे, मला आपण दूषणें लावतां कीं आपल्या घरची चाल पडली देशमुखीची, व माझी वागणूक उपजत पडली पाटलाच्या घराची. आपण कांहीं ह्मणा मी ईश्वरसाक्ष खरें वागेन तुमच्याशीं आज तागाईत प्रतारणा केली नाहीं. सासू व नणंद या मला जाचतात हे तुह्मी कधीं लक्ष्यांत घेत नाहीं. तीं आपलीं माणसें पडलीं. त्यांचें ह्मणणें खरें धरून तुह्मी मला सोडण्याचा संकल्प केला. तुमच्या साठीं मी सर्व जांच सोसेन परंतु मला आपण दगा देऊ नये.

तर अखेर तुमच्या पायापाशीं विनंती एवढीच कीं तुह्मी सावकाराचें कर्ज १७१ रुपये माझ्या नांवें आपल्या माथीं आहे तर तें चुकतें करून ऋणमुक्त व्हावें आणि मजला घेऊन जावें. मी आपल्या इच्छे प्रमाणें वागेन परंतु तुम्ही मला योग्य व नीट प्रकारें वागवाल अशी माझी व चार पंचांची खात्री करून द्यावी ह्मणजे संसार करण्यास खुषी आहे.

येणें प्रमाणें ही नोटीस पावल्या तारखे पासून आठ दिवसांत न केल्यास सावकारी कर्जाबद्दल लाचार होऊन फिर्याद करून नोटीशीचा खर्च व इतर खर्च या सहित कोर्ट मार्फत सर्व पैसा वसूल केला जाईल. कर्जाची फेड न करितां व मलाही वागविण्यास नेलें नाहीं तर आतां मला आयुष्य फुकट दवडावयाचें नाहीं. मला संसार करणें आहे तर तुह्मी मला लेखी फारकत दिली नाहीं तरी तुह्मी नवरेपणानें माझ्याशीं वागत नाहीं हीच सोडचिठ्ठी समजून निरुपायानें मला दुसरा घरठाव करावा लागेल व नंतर नवरेपणाच्या हक्काबद्दल तुमची तक्रार कांहीं एक ऐकिली जाणार नाहीं. कळावें तारीख १५ मार्च सन १८९४ इसवी.

( सही )

गिरजा मर्द नागो राहणार खरप
पांच पिंपळे तालुका आकोला
इच्या हातची निशाणी
बांगडी

नादारी मोकद्दमा नंबर १२/१८९३

नमुना नंबर (जी)

वि० नादारी कोर्टाचे ज्यडज्य जि० अकोले.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येते कीं, हरदेव विसनलाल मारवाडी राहणार आकोले हा नादारी आहे असा आज तारीख १० माहे मार्च सन १८९४ इ० रोजी ठराव झाला आहे. आणि तारिख २१ माहे एप्रिल सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा आसायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या याद्या उघड ठेविल्या आहेत.

ज्यांस नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांणीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचे प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाल करून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील कळावे तारीख १७-३-९४ इ०

B. B. Sule
Judge
Bankruptcy Court
AKOLA

नोटीस

नोटीस चाहादु वा संबु हरमकार टोपलीकर राहणार मौजे टेंभुरण तालुके खामगांव यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची मुलगी नामे मानकाई ही माझी लग्नाची बायको असून ती मजपाशीं नांदत नसल्या कारणानें चार लोकांत असें ठरलें कीं माझे लग्नाचे वगैरे खर्चाबद्दल तुह्मी मजला नोंदणार अमलदाराचे समक्ष रुपये २५० अडीचशे देऊन मी फारकती करून नोंदून द्यावी त्याप्रमाणें ता. ११-३-९४ इसवी रोजीं मौजे पहूरजिर येथें माझे घरीं तुह्मी न येतां मौजे जनुनें येथील कुकाजी वलद रंभाजी हरमकर व जाणू वा नारायण हरमकार व, लक्ष्मण माहे १, व गोविंदा वा नारायण मळके असे आले व मजला थाप दिली कीं तुह्मी एक रुपयाचा कागद आणावा तों पावेतों तुमचा सासराही मागून येतो त्याप्रमाणें मी एक रुपयाचा कागद आणला तरी तुह्मी आलां नाहीं. हे चार इसम ह्मणाले कीं फारकती लिहून ठेवावी व उदईक तुह्मी खामगांवीं नोंदण्याकरितां घेऊन यावी ह्मणले आह्मी तुमचे सासऱ्यास तिकडून रुपया घेऊन घेऊ त्यावरून मी फारकती लिहिण्यास लावली व फारकतींत रुपये अडीचशें लिहावें तों लिहिणारांनीं काय घोटाळा केला ती फारकती दोनशें रुपयांचीच लिहिली. त्यावरून मी त्या फारकतीवर माझे हातची निशाणी न करितां तसाच उठून आपले घरीं गेलों. फारकती पुरी झाली नाहीं. माझे मागें ती फारकती लिहिणार संभू वा एकोबा पोलीस पाटील पहूरकर यांनीं कांहीं पैसे घेऊन ह्या चवघांचे स्वाधीन केल्याचें मजला समजल्यावरून ही नोटीस देण्यांत येते कीं माझी निशाणी त्या कागदावर झाली नसून कागद नोंदला गेला नाहीं व मजला रुपयेही मिळाले नाहीं शिवाय अडीचशें रुपयाची फारकती लिहावी तों ह्या चौघांचें व लिहिणारांचे मत एक होऊन दोनशें रुपयांची फारकती लिहिली त्याजला स्टांप दोन रुपयांचा असावा तो अपूर कागदावर स फारकती लिहिली. त्यास ह्या सर्व कारणावरून फारकती खरी झाली कशी? आतां हे वर लिहिलेले इसम तुह्मास ही खोटी फारकती दाखवून थाप देऊन दुसरे कोणाशीं गंधर्व लावा ह्मणतील व त्याचे थापीनें आमची फारकती खरी धरून न घेतां गंधर्व लावल्यास तुमचेवर व आमचे बायकोला वरणार जो कोणी होईल त्यावर फौजदारी केली जाईल आतां ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसांचे आंत तुह्मी आमचे गांवीं येऊन ह्याचा निकाल करून घ्यावा. नाहींपेक्षां माझी खोटी फारकती माझे मागें केल्याबद्दल फौजदारींत फिर्याद करीन. तुह्मी येतांना हे फारकती जे लिहिणार तेही बरोबर आणावें व तुह्मी कदाचित् ह्या नोटीशीचें उत्तर कसेंही दिल्यास ते संबंधे हे चार इसम घेऊन आल्याशिवाय आह्मी कोणतेही प्रकारची तकरार ऐकणार नाहीं. कळावें. ता. १३-३-९४ इ.

(सही) शामू वलद उकर्डा सनन्से पहुरकर निशाणी खुद याच्या हातचा वखर असे.

नोटीस.

रखमाबाई मर्द कोंडजी शिंदे राहणार मौजे जांब प्रगणे व तालुके पुसद जिल्हा वाशिम इजला खालीं सही करणार याजकडून नोटीस दिली जाते कीं.

मौजे मजकूर येथील शेत स० नंबर ८३ १८४— ३० एकर ४ गुंठे आकार रुपये ६; व २० एकर ९ गुंठे आकार रुपये ७ अशीं दोन शेतें आमचा चुलता कोंडजी व आह्मी एकत्र राहात असता त्याचे नांवें खाते होतें. तो आता १७ वर्षे झाली मैत झाला त्यास पुत्र संतती नसल्या मुळें तुझें नांवें वरील शेताचे खाते जाहालें ह्या प्रत्येक शेतांत आमचा निम्मे व तुझा निम्मेचा हिस्सा आहे.

आमचा चुलता कोंडजी शिंदे मैत झाला तेव्हां वरील शेतांतील निम्मे शेत बद्दल जो हक आहे त्यांत तुजला अन्नवस्त्र रीती प्रमाणें द्यावे व तुझे हिस्याची जमीन वंशपरंपरेनें वाहून उत्पन्न घ्यावें असा ठराव पंचानुमते होऊन त्या प्रमाणें एकंदर दोन्ही शेतें त्यावेळां पासोन आज पर्यंत सतत वाहून उत्पन्न मी घेत आहो व रीती प्रमाणें अन्नवस्त्र आज पर्यंत देत आहो.

हाली आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं वरील शेताचे खाते तुमचे नांवें राहिल्यानीं हे शेत तुह्मी खरेदी देणार आहात असें समजते करितां या नोटीशीनें कळविलें जाते कीं वरील शेत कोणास गहाण, खरिदी वगैरे कोणत्याच तऱ्हेनें लिहून देऊं नये व त्याचे प्रमाणें लिहून कोणी घेऊ नये म्हणून कळविले आहे. ही नोटीस दिली तारीख १४ माहे मार्च सन १८९४ इ०

द० देवराव उ० पुसद. (सही) साहातजी वलद कामाजी शिंदे राहणार मौजे मजकूर निशाणी खुद.

जाहिरात

जाहिरात समस्त पंचित मंडळी यांस खालीं सही करणार याज कडून दिली जाते कीं चाहादु हरमकार टोपलीकर राहणार टेंभुरणे यांची मुलगी मानकी ही माझी लग्नाची बायको असोन ती माझे जवळ नांदण्यास राजी नाहीं वरून पंचांत तीचे बापाचा आमचा असा ठराव झाला कीं आमचे लग्नाचे खर्च वगैरे बदल रुपये २५० आमचे सासऱ्यानीं आम्हास द्यावे व आम्ही फारकती द्यावी व हे रुपये नोंदनार अंमलदाराचे समक्ष द्यावेत व फारकती रजिष्टर करून द्यावी त्या प्रमाणें त्यांनीं न करितां दुसरे चार इसम जनुनें येथील तुकाराम जानु व लक्ष्मण व गोविंदा वलद नारायण बाळके राहणार लांजुड तालुके मलकापूर हे चार इसम घेऊन मजला थाप दिली कीं तुमचा सासरा मागाहून येतो तों पर्यंत तुम्ही कागज वगैरे आणावा त्या प्रमाणें मी कागज आणला तरी तो आला नाहीं मग म्हणाले कीं फारकती लिहून तुमचे पाशी ठेवावी उदईक खामगांवी रजिष्टर करण्यास घेऊन यावी आम्ही गावांकडून तुमचे सासऱ्याला रुपये घेऊन आणितो. कचेरींत रुपये घेऊन फारकती त्यांचे स्वाधीन करावी. त्याचेयापीवर मी २५० रुपयांची फारकती लिहिण्यास लाविली तों आमचे येथील पोलिस पाटलाचा व या चौघांचा काय बेत जाला तर मुख्यांनीच दोनशे रुपयांची फारकती लिहीली परंतु वाचते वेळीं मजला समजलें कीं ही फारकती दोनशें रुपयांची आहे यावर मी म्हटलें कीं मी या फारकतीवर सही करीत नाहीं असें म्हणून मी लिहीणारास फारकती मागीतली तर त्यांनीं म्हटलें तुझी सही जाल्या शिवाय फारकती खरी होत नाहीं. वरून मी रागानें आपले घरीं गेलों मागें या लिहीणारणी कांहीं पैसे खाऊन ती फारकती वर लिहीले चौघांचे हवाले करून दिल्याची बातमी मजला लागली. वरून जाहिरातीनें कळवितों कीं हे खोटी फारकती कोणी खरी समजून आमचे बायकोशीं गंधर्व लावील तर त्यावर आम्हीं फिर्याद करू. करिता आमचे येथें हे चार जनुनें येथील खोटी फारकती जे नेणार, यांनीं व आमचे सासऱ्यांनीं आठ दिवसांत येऊन आमचे रुपये आम्हास देऊन फारकती रजीष्टर करून नेल्यास उत्तम आहे, नाहीं पेक्षां आमचे नावची फारकती खोटी केल्या बद्दल आम्ही फिर्याद करणार आहों परंतु सर्वत्र लोकांस ही सूचना आहे कीं ह्या फारकतीचे भरंवशावर कोणीही ह्याची बायको केल्यास शिक्षेस पात्र होईल कारण फारकती दोनशे रुपयांची केली त्याजला स्टांप अपुरा असोन केवळ चाई सारखी कसी तरी औपल्यास फारकती ही मिळाली असा आनंद मानून हे च्यार इसम आपले गांवीं गेले यावर कोणीही फसूं नये ही आमची सूचना आहे कळावें ता० १३-३-९४ इ०

(सही) शामू वलद उकर्डा सनन्से रा. पहुरजीरे ता० खामगांव यांचे हातचा वखर असे

promised scheme of making several branches of Public Service open to the Natives of India. It is no doubt true that such a measure however salutary to the rulers and the ruled will take some time for its enforcement. Yet the expenditure will have to be curtailed and the House of Commons will have more seriously to consider the problem.

Threatened dissolution promises the election of Liberal Majorities; the Irish Home Rulers withhold their support from Lord Rosebury if be do not espouse the cause of Home Rule; and at any rate there are chances of a strong move against a house of hereditary peers not recognising the short-comings and requirements of the people.

In our September members we have pointed to the position, the Commons would assume and our anticipations have been realised.

---

We summarise the following from a leading newspaper which appeared a few days ago;—"the great iniquities and falsehoods of our customs must be corrected, the standard of practical morality must be raised and high ideals must be placed before the people. The sense of Indian justice they say is often lulled into sleep by thinking of what they call circumstances. Sometimes considerations of friendship, of pity, of displeasing some whose uniform and acknowledged favorites are concerned often interefere with our lines of action. If this be the convention of Indian morality, one other element also enters into these considerations. It is they say a political element. Political motives and political considerations prevent us from being just and truth loving lest the rights for representations and privileges for higher appointments and more share in government which we seek will be naturally denied to us. But if people of this school were our prototypes, guides, and moral instructors, what will be the condition of the nation as a whole? A leader afraid of the people in whose nation such doctrines are freely given and this preacher is regarded a political philosopher is being gradually led to further destruction."

This view, we have ever advocated in our columns from time to time. An age of *exposure* does immense good to a rising people. In our nation virtue has become militant and to raise her standard her perverters must be exposed whoever they be. Likewise there must be some martyrs for her. She must have a heirarchy and a pedigree all her own. This truth can never be too trite and we are glad we have men who think like us.

---

Social reform is a handmaid to political reform Both are the different phases of an onward and progressive movement of the people. You cannot separate them and pursue the one to the exclusion of the other. Each of them acts and reacts. Many people however misread this social phenomenon and argue that one ought to precede the other. While referring to the speech of Dewan Norendra nath at the last Social Conference and to the Comocation address of Dr. Bhandarkar the learned and able editor of the 'Hindu' of Madras thus interprets the present social and political reforms:—

"Our facilities are all intellectual, our difficulties are all moral," said Dewan Norendranath, "So far as the apprehension of an idea even the most advanced is concerned we are not behind any nation; but when the question comes to carrying these ideas into practice our chief difficulty commences." But if our dufficulties are moral, much more so are our duties to our society. And social reform must be a tug-of-war between the moral difficulties and moral duties, in which the latter should steadily, if slowly, gain ground and achieve ultimate triumph The remarks of Dewan Norendranath on the the prevailing tendency of "Liberalism in politics and Conservation in social reform" are apt and very timely. Some of the remarks contained in that excel lent address which Dr. Bhandarkar delievered to the graduates of the Bombay University in Convection assembled, have been misconstrued by some of our contemporaries as being hostile to the National Congress. We do not think so at all. All political progress is only a phase of social progress; and the principle that a society cannot progress unless the individuals in it strive and labour after higher and higher ideals, therefore, applies equally to political progress, It is absurd to find fault with a friend who advises one who builds a house to make sure of the foundation."

---

The people of India will hail with great delight the appointment of Lord Reay to the post of the Under Secretary. The Madras Daily remarks in this con nection to the following effect:—

"Cherishing as Indian people did such a memory of this nobleman, it was natural that, when Mr. Gladstone sometime back was casting about for a successor to Lord Lansdowne, they earnestly wished his choice fell on Lord Reay. As Under-Secretary, and especially with a Secretary of State whose knowledge of India is so scanty as Mr. Fowler's, Lord Reay's Indian experience ought to be of high service both to the Government and the people of India. We ought not to hear any more, during Lord Reay's tenure of office, of Her Majest'y Government ignorantly coming to conclusions over the heads of the Indian Government. Lord Reay has come to office just at the nick of time. The Simultaneous Examination resolution is hanging fire, the Exchange compensation allowances demand an early abolition, and the Indian finances stand in danger of being shipwrecked on shoals of political partisanship. In all these questions Lord Reay may be expected to make his influence beneficially felt, and we confidently predict for Lord Reay a successful career in his new office. The people of India have the greatest confidence in him, and are grateful to Lord Rosebury for his choice of the new Under-Secretary of State for India. We feel sure that means will be found to apprise Lord Reay of the feeling of India on his happy appointment to guide and control her destinies."

---

In the Historical Summary attached to the Administration report for 1892-93 we find at the out set a brief abridge ment of the provincial history from al most the begining of the 13th century. There is nothing important in it except a bare mention of the facts in a connected narrative. It is however ably writen and presents an intelligent and retrospective summary of a large period of six centuries and a half. As we come towards the close we are disappointed because the writer contents himself with bare quotations from old documents. The following paras are however worth repetition and a careful perusal of them will reward a reader with a nice and well-calculated forecast of the British administration formed by Sir Richard Temple.

"But there shortly supervened the consequences of the American war, which indeed stimulated many parts of India, but which (if the metaphor is admissible) positively electrified Berar. Before this, cotton had been one out of many staples. It now became the prevailing, absorbing, predominating product. Much of other sorts of culture was displaced to make room for it. The people imported quantities of food-grain from the Nagpur country, in order that they might have the more land whereon to raise the remunerative cotton crop. The staple, too, is one that requires much manual toil in weeding, picking, ginning, packing, and the like. Hence there arose a great and urgent demand for rural labour which of course operated to raise the standard of wages. A great exporation of cotton to Bombay was soon established. The importation of foreign produce was far from proportionate; consequently, much of the return for this cotton consisted of cash and bullion. This circumstance, making money cheap, tended to raise the prices of all things; Another effect was that the labouring and produsing classes, especially the agriculturists, were rapidly enriched.

At the very same time, the construction of railway works throughout the whole length of province was at its full swing, not only causing the employment of all labour, skilled and unskilled, that could be got on the spot, but also introducing a large foreign element which settled tempor arily, at least, in the province Thus the value of labour, and the rates of prices generally, were still further enhanced.

In other parts of India, the operation of these or similar causes has been perceptible, but in many parts it has been partial only; in others its force may have been detracted from by other influences. But in Berar it was universal, extending from one end of the province to the other; and there was nothing whatever to counteract its force. It is this sort of universality which constitutes, perhaps, the peculiarity of the process in these districts.

This state of things has rendered the people generally prosperous, progressive, and contented. Some classes do unfortunately suffer therefrom. This, though perhaps it may be mitigated, cannot altogether be helped. Those who suffer will naturally complain, but that the accession to provincial prosperity has been vast and rapid is unquestionable. The most sanguine anticipations of the growth of the province in importance have been more than realized, and there is every thing in favour of its further increase."

No doubt, this is one side of the picture and that is again the bright one. Progress is the one and consistent feature of the summary. Facts and figures may be quoted from the Census Reports to justify the soundness of the above prophecy but we question whether it is not a fact that the people are getting poorer and poor. If it be a thing of stern reality in spite of the circulating maxims of peace and prosperity the difficulty is as how to account for it.

---

## वऱ्हाड.

सुटी-हुताशनि निमित्त मामूल वहिवाटी प्रमाणें येत्या २६ मार्च तारखेला 'वऱ्हाड समाचारा'चा अंक निघणार नाहीं.

हवामान— हवेचा उपद्रव कमी कमी होत आहे. दिवसा ऊन कडक असतें पण रात्रीं थंडीही पडते. या सप्तकांत पाऊस पडण्याचीं चिन्हें फार होत आहेत. वारा फारच सोसाट्याचा वाहतो. तुरळक व किरकोळ आजार धरून पाहतां सार्वजनिक आरोग्य ठीक नाहीं

भयंकर आग— गेल्या शुक्रवारीं उमरावती येथें बोहरी आळीच्या पलिकडे किराणेवाल्यांचीं दुकानें आहेत तेथें काहीं बारूद दारूस एका मुलाच्या हातच्या आगकाडीनें आग लागून सुमारें १८ दुकानें जळून खाक झालीं. अंदाजा असा काढतात कीं दीड लाख रुपयांचें नुकसान झालें. तीन माणसें आगींत सांपडून मेलीं. पाण्याची हाकाहाक व रस्ते अरुंद म्हणून आग फार वाढली. अकोला मुनसिपालिटीनें हरएक घरा मागें व दुकाना मागें कांहीं कांहीं पाण्याचा सांठा ठेवविण्या विषयीं सक्ती करावी आणि ही सक्ती आतां पासून अंमलांत आणावी असें आम्हीं मुनसिपालिटीस वरील उदाहरणा वरून अगाऊ सूचवितों.

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार यांनीं अकोलें करांचे निमंत्रणास मान दिला आणि त्या अन्वयें येत्या २३ वे तारखेस येथें मोठा उत्सव होणार आहे.

राव बहादूर जठार हे आपल्या गळ्यांतली माळ राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. यांच्या गळ्यांत घालून लागलीच २४ वे तारखेस पुण्यास रवाना होतील.

येत्या बुधवारा व गुरुवारीं मलकापूरास हायस्कूलचे माजी विद्यार्थी वार्षिक समारंभास जमतील. नव्या जुन्या विद्यार्थ्यांचा परिचय होऊन शिमग्याचा सण मोठ्या आनंदांत जातो. राव बहादुर जठार हे या समयास येणार आहेत.

पातुर येथील 'श्रीकुमार शंकरसिंह लायब्ररी'चा तिसरे वर्षाचा वार्षिक समारंभ येत्या पहिले तारखेस होणार आहे. तेव्हां निबंधवाचन व आहारविहार यांत एक दिवस आनंदानें गांवकरी लोक घालवून लायब्ररीची संस्था उत्कर्षास आणतील असें आम्ही इच्छितों.

कर्नल मेकंझी कमिशनर यांची स्वारी उन्हाळ्या निमित्त चिखलदऱ्यास गेली.

इंगोलीच्या खुनी मोकदम्याचा गेल्या सोमवारीं निकाल होऊन नरसय्या नांवाच्या एका आरोपीस काळेपाण्याची शिक्षा झाली.

रा. रा. गणेश बापूजी ए॰ असि॰ क॰ येत्या महिन्यांत रजेवरून परत आल्यानंतर अकोल्याहून यवतमाळास बदलप्रमाणें यवतमाळास रुजू होतील. असें कळतें.

रा. रा. त्रिंबक गणेश परांजपे एकस्ट्रा असि. कमिशनर यांची बदली मेळघाटास होणार होती पण ती रद्द होऊन ते उमरावतीसच कायम राहतील.

---

## वर्तमानसार.

☞ पुरवणी पहा.

मि. ग्लाडस्टन यांच्या राजीनाम्याचें आतां एक नवेंच कारण बाहेर आलें आहे व तें चमत्कारीक असून भयंकरही आहे. मि ग्लाडस्टन यांणीं डोळ्याच्या आजारामुळें राजीनामा दिला नसून वृद्धापकाळामुळेंही दिलेला नाहीं; त्याचप्रमाणें पॅरिश कौन्सिल बिल व एंपलायर्स लायबेलिटी बिल हीं बिलें लार्ड सभेनें हाणून पाडल्यामुळेंही त्यांणीं राजीनामा दिला नाहीं. तर त्यांच्या राजीनाम्याचें कारण अगदीं वेगळें आहे. त्याचें खरें कारण असें आहे कीं, युरोपांत एक मोठी लढाई सुरू होण्याचीं चिन्हें अगदीं भरपूर रीतीनें दिसत असल्यामुळें तशा वेळीं इंग्लंडचा कारभार करणारा माणूस नास्त तरतरीत, मेहनती व दांडगा असणें अवश्य आहे असें त्यांच्या मनानें घेतलें असल्यामुळें त्यांणीं हा राजीनामा दिला आहे. लोकांची ही समजूत इतकी वाढली आहे कीं, या लढाईचा बोजा इंग्लंडावरच पडावयाचा असून ती कोणत्या घटकेस सुरू होईल याचा कांहीं नेम नाहीं असें झालें आहे, आणि त्यामुळें राजकारस्थानी लोकांचीं मनें अगदीं चळवळून गेलीं आहेत. लार्ड रोजबरी यांची मुख्य प्रधानकीच्या जागीं जी नेमणूक झाली त्या नेमणुकीस विरुद्ध पक्षाकडून हरकत आणण्यांत आली नाहीं त्याचें कारणही तेंच आहे. ह्मणजे हल्लींच्या अडचणीच्या व नाजूक प्रसंगीं लार्ड रोजबरीसारखाच मुख्यप्रधान असणें चांगलें असें सर्व लोकांचें मत आहे. या अडचणीच्या प्रसंगीं मुख्यप्रधानाच्या जागीं लार्ड पामर्स्टनच्या तालमीचाच कोणी माणूस असणें अवश्य आहे असें सर्व प्रकारच्या व वेगळाल्या विचारांच्या लोकांचेंही मत आहे, आणि तें काम लार्ड रोजबरी हेच जास्त चांगल्या रीतीनें करतील अशी सर्वांची समजूत आहे. हा सर्व प्रकार जरी असा आहे तरी ग्लाडस्टन पक्षाशीं विरुद्ध रीतीनें वागणाऱ्या सर्व लोकांचें लार्ड रोजबरी यांच्या हातून एकीकरण करवेल किंवा नाहीं याची शंका आहे व त्यामुळें पुन्हा निवड करण्याची पाळी येते कीं काय याची भीति आहे. पण पुन्हा निवड झाली आणि त्यांत कानसरवेटिव पक्ष राज्यकारभारारूढ झाला तरीही लार्ड रोजबरी हे पुन्हाही परराज्यासंबंधीं प्रधान होणारच असेंही सांगतात. हा सर्व प्रकार मोठा गमतीचा आहे व त्यांतून खरें काय निघतें हें पहाणें आहे.

विलायती कापडावर जकात बसविली नाहीं हा उघड अन्याय आहे असा कानपूरच्या लोकांनीं प्रसिद्ध सभा करून ठराव केला.

कलकत्ता व मद्रास येथील लोकांनींही प्रसिद्ध सभा करून तसेच ठराव केले.

पुण्याच्या सभेनेंही तसा एक अर्ज करून शिवाय तारही पाठविली आहे.

ज्या गोष्टी चांगल्या करतां असतात त्या कधीं कधीं वाईटाकरतांही होतात. मुसलमानी स्त्रिया गाडींतून जात असल्यामुळें त्यांचा गोशा संभाळण्याकरतां गाडीस पडदे वगैरे साडलेले असतात व अशा गाडीचे पडदे एकीकडे करून आंत काय आहे हें पाहण्याचा यत्न करणें ह्मणजे अन्याय करणें आहे. मद्रासेंत मुंबई प्रमाणेंच तंबाकुवर जकात आहे व ती जकात चुकविण्याकरतां कित्येक लोक असल्या पडद्याच्या गाड्यांतून तंबाकू शहरांत नेत असतात व नाक्यावर किंवा दुसऱ्या कोंठ इन्स्पेक्टर वगैरे गाडींत काय आहे हें पाहण्याचा यत्न करूं लागल्यास गोशा, गोशा, ह्मणून त्यास घाबरवून लावत त असें आतां बाहेर आलें असून तशा प्रकारचा एक खटला माजिस्त्रेटापुढेंही आला आहे.

पेशावर येथील कांहीं व्यापाऱ्यांचेंपा काबूल येथील एजंटास काबूलच्या अमिरानें कैद करून, त्यांच्या पाशीं थोड्या वर्षांपूर्वीं ज्यानें अमिराच्या विरुद्ध बंडावा केला" त्या तुर्कस्थानचा अफगाण गव्हर्नर इशाकखान याच्या नांवाचे रुपये सांपडल्यामुळें अमिरानें त्या एजंटास मोठाले दंड केले अशी पेशावर येथें बातमी आली आहे. हे व्यापारी म्युनिसिपल कमिशनर मिया मिर अहमद व मिया अहमद गुल हे असून त्यांच्या एजंटांस अनुक्रमें ८०,००० रुपये व १,६१,००० रुपये असे दंड केले असें सांगतात. पैसा जमा करण्यास ही चांगली युक्ती काढली ह्मणावयाची !

वारन डी हार्न नावाच्या एका साहेबांचें सुमारें दाहा लाख रुपयांचें जवाहीर सिंगापूर येथें नुकतेंच चोरीस गेलें असें सांगतात. यांत अनेक प्रकारचें जवाहीर असून शिवाय रशीयाच्या पहिल्या अलक्झांडर बादशहाचें कांहीं इतिहासप्रसिद्ध जवाहीर असून हिंदुस्थानच्या अकबर बादशहाच्या वेळेंचेंही कांहीं होतें. हें अकबराचें जवाहीर या साहेबाकडे कसें गेलें होतें?

ब्रिटिश इंग्रजी व टेट यांच्या दरम्यान तार सुरूं करण्यास पोर्टुगीस लोकांनीं हरकत केल्यावरून इंग्रजी फौजेनें त्या पोर्टुगीस लोकांवर गोळी सुरूं केली असें केप येथील बातमीवरून समजतें. ठा० अ०

स्तुत्य देणगी — बऱ्हाणपूर येथील कालेजाकरितां कालीकोटच्या राजेसाहेबांनीं ६००० रुपये उत्पन्न होईल इतकी जमीनच लावून दिली आहे. पूर्वीं ते दरमहा २०० रुपये देत असत.

फार जुनी फुलें — इजिप्टमध्यें मसाला भरून ठेविलेल्या प्रेतांचे पेट्यांत ठेविलेलीं ५ किंवा ६ हजार वर्षांपूर्वींचीं फुलें न सुकतां जशीच्या तशीं राहिलेलीं नुकतींच काढलीं असून तीं हल्लीं केरो येथील प्रदर्शनांत लोकांना पाहण्यासाठीं ठेविलीं आहेत. हिंदुस्थानच्या बरोबरीनें फार सुधारलेला व कलाकौशल्य निपुण असा मिसर देश मात्र फार प्राचीनकाळीं होता असा जसा दाखला मिळत आहे तसेंच ५ किंवा ६ हजार वर्षांपूर्वींचीं फुलें जशीच्या तशीं राखून ठेविलेलीं आज पाहाण्यांत मिळत आहेत.

स्त्री न्यायाधीश—न्यूझीलंडमध्यें वन्हुंगा येथें मिसेस एलिझाबेथ येटस नांवाच्या बाईला मुख्य न्यायाधीश नेमलें व तिणें त्या कामाचा चार्ज घेतला तेव्हां मोठ्या थाटमाटाचा समारंभ झाला.

मॅनचेस्टरच्या व्यापाऱ्यांकडून एक डेप्युटेशन लार्ड किंबरले, हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांजकडे थोड्या दिवसांपूर्वीं गेलें होतें. ह्या डेप्युटेशनानें हिंदुस्थानांत जाणाऱ्या कापडावर व सुतावर सरकारानें जकात बसवूं नये ह्मणून विनंति केली. ह्या विनंतीस अनुसरून लार्ड किंबरले साहेब ह्यांनीं असें उत्तर दिलें कीं हिंदुस्थानांत जाणाऱ्या कापडावर आणि सुतावर पुन्हा जकात बसविण्यासारखी हिंदुस्थान सरकारची स्थिति अद्याप आली नाहीं. न्यायाधीश स्वतः पक्षकार असतो येथें असाच न्याय व्हावयाचा.

बिहार प्रांतांतील निळीचा व्यापार करणाऱ्या मोठ्या व वजनदार युरोपियन मंडळीनें इंग्रज सरकारास नुकताच एक अर्ज केला आहे, व त्यात "पोलीस किंवा स्थानिक सरकारच्या नांवलानीं न करतां, खुद्द वरिष्ठ सरकारानीं आपल्या नांवानें गोवधाच्या बाबतींत योग्य नियमाचा हुकूम फार लौकर प्रसिद्ध करावा; आणि त्यात गोवधाचा काळ व जागा मुक्रर ठरविण्या बद्दल सरकारची हक्की ठेवून सरकारी क्लब किंवा लष्कर याच्यासाठीं देखील गायी व्हावयाच्या त्या ब्राह्मणांच्या स्वधीन असलेल्या न घेण्याविषयीं व हिंदूना जिकडून गोवधाचा भयंकरपणा वाटणार नाहीं व दुसऱ्यांच्याहि हक्कांचें योग्य संरक्षण, परंतु तें नियमित बंधारणानें होईल अशी कळकळीची तजवीज करावी, अशी सरकाराजवळ मोठी जोरदार मागणी केली आहे व ती अमलांत लौकर येणें फार जरूरीचे आहे असें साधारण दर्शविलें आहे. एकूण असा योग्य बंदोबस्त होणें, हें युरोपियनास देखील भाग पडू लागलें आहे तर ! न्या० सु०

सहा वर्षांनीं जगाचा अंत होणार सावध व्हा !! रुडाल्फफाल्ब या नांवाच्या एका खगोल शास्त्रवेत्त्यानें लेपसिक येथें नुक्तें व्याख्यान दिलें त्यावेळीं त्याणें सांगितलें कीं, मागें १८६६ मध्यें जो तेजःपुंज धूमकेतू दृष्टीगोचर झाला तोच पुनः १८९९ च्या नवंबर महिन्यांत उगवून पृथ्वीची आणि त्याची टक्कर होईल व त्या टकरीमध्यें पृथ्वीचा अंत होईल. आणि कदाचित् तसा भयंकर प्रकार न घडला तरी निदान तारीख १३,१४,१५ नवंबर सन १८९९ रोजीं संध्याकाळचे दोन पासून पांच पर्यंत आकाशांतून अगणित नक्षत्रगात होऊन गडबड उडून जाईल, सावध असा!

अमेरिकेंत एका शतायुषी स्त्रीनें आपले इतके दिवस जगण्याचें कारण हें सांगितलें कीं, मी बहाकाफी बिलकूल पीत नाहीं इतें अद्यापपर्यंत लग्नही झालें नाहीं. आमच्या इकडे नवी पिढी तयार करणारांना तांबड्या पाण्याशिवाय झोंप येत नाहीं, काफीशिवाय झोंप जात जात नाहीं. चहाशिवाय शौचास होत नाहीं, आणि बिस्किटाशिवाय भूक भागत नाहीं, मग त्यांच्या तालमींत तयार होऊन जगापुढें येणारी मंडळी अल्पायुषी व्हावी यांत आश्चर्य कशाचें !

टेलिफोन शोधून काढणारे प्रो. बेल, हे हल्लीं नोव्हास्कोशिया येथें हवेंत चालणाऱ्या यंत्राची युक्ती काढण्यात गढून गेले आहेत त्यांना ह्या कामात बहुत्रा यश येईल असा रंग दिसतो. क० त०

बोटीवर हल्ला— कलकत्त्या जवळील मटला नदींतून व्यापारी लोकांचा ताग भरून ३ बोटी जात होत्या; त्यांवर सुमारें ३०० गांवरी लोकांनीं हल्ला करून आंतील माल पळवून नेला. पोलीस तपासास लागले होते, परंतु त्याला ही गांवकऱ्यांनीं ठोक देऊन तीन असामी जखमी केले. ते दवाखान्यांत बेमार आहेत. आरोपींचा आजून पत्ता नाहीं.

बायकोची विक्री— रशिया देशात लग्नाच्या बायका विकण्याची चाल आहे असें दिसतें. थोड्या दिवसां पूर्वीं खारकाफ प्रांतांत एका शेतकऱ्यानें आपली बायको १६० रुबल घेऊन दुसऱ्यास विकत देऊन पैसे पोंचल्या बद्दल त्यानें भरपाई चिठ्ठीही लिहून दिली; पुढें पंधरा दिवसांनीं ती बायको परत विकत घेण्यास ता तयार झाला होता, व खोदोझाराची ही त्याला कबूल होती; परंतु त्या बायकोनेंच तसें करण्याचें साफ नाकारिलें. त्यानें सरकार दरबार केलें होतें परतु तें कोणी ऐकलें नाहीं.

छोटानागपूर संस्थानांत सोन्याच्या खाणी सापडण्याचा संभव असल्या मुळें त्या प्रांतात खाणीच्या सरवेचें काम सरकार लवकरच सुरू करील, असें दिसत आहे.

कांहीं अमेरिकन लोक तुर्कीच्या सुलतानाचे हकुमा वरून अलेक्झांड्रेट येथें कैद करण्यात आले होते; त्याच्यावर आरोप व्हावयाचा होता. सदर्हू कैद्यांना सोडून देण्या बद्दल अमेरिकेचे प्रतिनिधींनीं सुलतानाला लिहिलें होतें, व सुलतान प्रथम नाकबूल होते; परंतु अमेरिकन सरकारानें लढाऊ जहाजें पाठविण्याची तयारी केली, तेव्हां एक शिवाय करून बाकीचे अमेरिकन कैदी सोडून देण्याचा हुकूम सुलताननें केला असें प्रसिद्ध झालें आहे. चवदाव्या रत्नाची भिती सर्व लहान थोरांस खासखीच वाटते. !

लार्ड हारीस साहेब मुंबईचे गव्हर्नर हे कोल्हापुरास जाण्या पूर्वीं कलकत्यास व्हाईसरायांचे मुलाखती साठीं जाऊन येणार आहेत.

नवीनपंखा—कलकत्ता येथें मि० मार्गन नांवाचे एका गृहस्थानें एक स्वयमेव हालत राहणारा पंखा तयार केला आहे. स० शो०

विलायतेहून जे नवे सनदी हिंदुस्थानांत पाठविले जातात ते असावे तितके शहाणे नसल्यामुळें इकडे आल्यावर कित्येक दिवस पर्यंत कामाच्या अगदीं नालायक असतात, या करितां इकडे पाठवावयाचे नवे सनदी जास्त शहाणे करून पाठवावे अशी मद्रास सरकारानें हिंदुस्थानसरकारास एक सूचना केली आहे असें सांगतात. खरें असेल तर मद्रासच्या सरकारास वेड लागलें की काय अशी शंका येत्ये ! विलायती माणसें उपजल्याबरोबरच शहाणी असतात हें त्या सरकारास माहित नाहीं कीं काय?

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा, स्टेशन धर्म शाळेचा, व आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा सन १८९४।९५ सालाकरितां हरास तारीख २२ माहे मार्च सन १८९४ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वजतां टौनहालांत करण्यात येणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यानीं सदर्हू तारखेस हजर होण्याचें करावें. कळावें तारीख २२ माहे फब्रुवारि सन १८९४ इसवी.

B. M. Sathe
Secretary
A. M. C.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.